


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक २३७ * नांदेड * शनिवार, दि. ५ सप्टेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाच्या समर्थनार्थ नांदेड कडकडीत बंद

## राज कॉर्नर ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत भव्य रॅली

**नांदेड (प्रल्हाद कांबळे)–** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी सकल मराठा समाजाने शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर रोजी पुकारलेल्या नांदेड बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सकाळपासूनच शहरातील बाजारपेठा, दुकाने व व्यावसायिक प्रतिष्ठाने बंद ठेवण्यात आल्याने शहरात कडकडीत बंदचे चित्र होते. आंदोलनकर्त्यांनी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आणि निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर यांना आपल्या मागण्यांचे निवेदन दिले. सदरचे निवेदन हे मुख्यमंत्र्याला पाठविण्याचे आवाहन केले.

मोर्चाच्या पार्श्वभुमीवर व्यापारी संघटना, सामाजिक संघटना, शिक्षण संस्था व नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने बंदमध्ये सहभाग घेतला. सिडको, हडको, तरोडा नाका, भावसार चौक, वजिराबाद, जुना मोंढा, सराफा, कपडा मार्केट, शिवाजीनगर, छत्रपती चौक, अण्णाभाऊ साठे चौक, गांधीनगर, आसना बायपास सांगवी, बर्की चौक, आनंद नगर, चैतन्य नगर, भाग्यनगर परिसरातील व्यापाऱ्यांनी दुकाने बंद ठेवून पाठिंबा दिला. नेहमी गजबजलेल्या प्रमुख रस्त्यांवर शुकशुकाट होता. काही खासगी शाळा व कोचिंग क्लासेसनाही सुट्टी देण्यात आल्याने बंदचा परिणाम शैक्षणिक क्षेत्रातही जाणवला.

बंददरम्यान सकल मराठा समाजाच्या वतीने राज कॉर्नर येथून भव्य रॅली काढण्यात आली. आयटीआयमार्गे ही रॅली जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकली. रॅलीत आमदार बालाजीराव कल्याणकर, आमदार आनंदराव बोंढारकर, दत्ता पाटील कोकाटे, माधव देवसरकर, सुनील कदम, नवनाथ जोगदंड, रमेश पाटील कोकाटे, शिवराज पाटील होटाळकर, विनोद पावडे, सदा पुयड, वसंत सुगावे, संतोष गव्हाणे, विनय गिरडे, बाळू मोरे, प्रवीण पाटील चिखलीकर, बाळासाहेब रावणगावकर, माधव पावडे, गणेश कोकाटे, माणिक देशमुख, शिवाजी पावडे, पंजाब काळे, दशरथ कपाटे, संकेत पाटील, चक्रधर कोकाटे यांच्यासह जयश्री पावडे, संध्या बालाजीराव कल्याणकर, आशाताई श्यामसुंदर शिंदे, डॉ. विद्या पाटील, कल्पना डोंगळीकर, संगीता डक, मीनल पाटील आदी मराठा बांधव, नागरिक व विविध संघटनांचे पदाधिकारी सहभागी झाले होते. जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात समाजाच्या नेत्यांनी उपस्थितांना संबोधित करत शासनाने मराठा आरक्षणाकडे गांभीर्याने पाहावे व जरांगे पाटलांच्या आंदोलनाची दखल घ्यावी, अशी मागणी केली.

### पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त

कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलिस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी प्रमुख चौक व संवेदनशील ठिकाणी कडेकोट बंदोबस्त तैनात केला होता. यावेळी स्वतः उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर व्यंजने, प्रशांत शिंदे, यांच्यासह पोलीस निरीक्षक संतोष तांबे, महेश माळी, राजेश पुरी, अजित कुंभार, रामेश्वर खनाळ, रामदास शेंडगे, ओमकांत चिंचोलकर यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले, शहर वाहतूक शाखेचे मारुती मुंडे हे स्वतः लक्ष ठेवून होते.

### शहरातील खासदार–आमदारांच्या घराबाहेर बंदोबस्त

सकल मराठा समाजाच्या वतीने मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या समर्थनार्थ पुकारलेल्या बंद दरम्यान काही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी शहरातील खासदार व आमदार यांच्या निवासस्थानांना चोख बंदोबस्त तैनात केला होता.

### सोपान नेव्हल पाटील यांनी उपोषण सोडले

सकल मराठा समाजाच्या आंदोलनात सहभागी झालेल्या सर्व समाज बांधवांनी ३० ऑगस्ट पासून सुरू केलेले सोपान नेव्हल पाटील यांनी आमरण उपोषण सोडले. प्रमुख कार्यकर्त्यांच्या आणि पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांच्या हस्ते त्यांना ज्यूस पाजून उपोषण सोडविण्यात आले. मात्र हे उपोषण साखळी पद्धतीने सुरू राहील असेही सोपान पाटील यांनी सांगितले.






### दोन आमदारांच्या मोर्चातील सहभागावरून चर्चांना उधाण

रॅलीत सहभागी झालेले शिवसेनेचे आमदार बालाजी कल्याणकर (नांदेड उत्तर) व आनंदराव पाटील बोंढारकर (नांदेड दक्षिण) यांना रॅली आयटीआय जवळ येताच काही युवकांच्या रोषाला सामोरे जावे लागल्याचे सांगण्यात आले. काही आंदोलकांनी घोषणाबाजी करत त्यांना जाण्यास सांगितले, त्यावरून काहीसा तणाव निर्माण झाल्याचेही सांगण्यात आले. आंदोलकांचा रोष पाहून दोन्ही आमदारांनी तेथून निघून जाणे पसंत केले. मात्र, आ. बोंढारकर यांनी 'असे काही घडलेच नाही' एवढेच नाही तर आम्ही दुसऱ्या एका महत्त्वाचा कार्यक्रमाला जात असल्याचा दावा केला आहे. या प्रकाराची शहरात चर्चा रंगली होती.

### किनवटमध्ये बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ आणि राज्य शासनाच्या धोरणांचा निषेध नोंदवण्यासाठी शुक्रवारी दि. ४ रोजी सकल मराठा समजाच्यावतीने पुकारण्यात आलेल्या बंदला किनवट आणि गोकुंदा परिसरात नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. किनवट व गोकुंदा भागातील प्रमुख बाजारपेठा, दुकाने आणि व्यावसायिक प्रतिष्ठाने बंद ठेवून व्यापाऱ्यांनी पाठिंबा दर्शवला. किनवट आणि गोकुंदा येथील बंददरम्यान सकल मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी मोटारसायकल रॅली काढून आपला रोष व्यक्त केला. त्यानंतर आंदोलक जिजामाता चौकात एकत्र आले आणि त्यांनी राज्य सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. पोलीस निरीक्षक जगदीश मंडलावार यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण शहरात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. बंद यशस्वी केल्याबद्दल सकल मराठा समाजाच्यावतीने व्यापाऱ्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.









# सकल मराठा समाज बांधवांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत सिडको-हडको बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** मराठा आरक्षण आणि मनोज जरांगे पाटील यांच्या अंतरवली सराटी येथील आमरण उपोषणाच्या समर्थनार्थ सकल मराठा समाजाच्यावतीने दि. ४ सप्टेंबर रोजी नांदेड जिल्हा बंदचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत नवीन नांदेड, सिडको व हडको परिसरातील व्यापारी, व्यावसायिक आणि शैक्षणिक संस्थांनी आपली प्रतिष्ठाने उत्स्फूर्तपणे बंद ठेवली.

मनोज जरांगे पाटील हे मराठा आरक्षणासह इतर प्रमुख मागण्यांसाठी २९ ऑगस्टपासून अंतरवली सराटी येथे आमरण उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या या आंदोलनाला पाठिंबा दर्शवण्यासाठी हडको–सिडको परिसरातील सकल समाज बांधव





एकवटले होते. बंदच्या सुरुवातीला हडको येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवरायांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. त्यानंतर हडको, ज्ञानेश्वर नगर, अण्णाभाऊ साठे पुतळा परिसर, छत्रपती शिवाजी महाराज चौक, संभाजी चौक, जुने वसंतराव नाईक महाविद्यालय ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक (लातूर फाटा) अशी भव्य दुचाकी रॅली काढण्यात आली. रॅलीदरम्यान आरक्षण आमच्या हक्काचे, नाही कुणाच्या बापाचे आणि छत्रपती शिवाजी महाराज की जय अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या.

या बंदमध्ये मुख्य मार्गावरील सर्व व्यापारी पेठा, भाजीपाला–फळ विक्रेते, हॉटेल्स आणि प्राथमिक शाळांसह शैक्षणिक संस्था पूर्णपणे सहभागी झाल्या होत्या. तसेच परिसरातील विविध राजकीय पक्ष, लोकप्रतिनिधी आणि सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या आंदोलनात भाजपचे नगरसेवक संजय पाटील घोगरे, वैजनाथ देशमुख, नगरसेवक प्रतिनिधी उदय देशमुख, राजू लांडगे, सतीश बसवदे, नांदेड दक्षिण शिवसेना जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे, संभाजी ब्रिगेड विभागीय अध्यक्ष संकेत पाटील, दीपक भरकड, सोपान पांडे, बापूसाहेब पाटील, संदीप कदम, विठ्ठल जाधव, प्रल्हाद गव्हाणे, दिनेश भरकड, गोविंद शिरसीकर, दिगंबर शिंदे, प्रकाश घोगरे, व्यंकट गव्हाणे, महेश शिंदे, विनोद जाधव, प्रताप पवार, शाहीर गौतम पवार, शंकरराव धिरडीकर, देवराव मोरे, प्रणाम मोरे, विनायक काळे, परमेश्वर पाटील माळेगावे, माधव पाटील कवटावाडीकर यांच्यासह समाज बांधव व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

सिडको–हडको शहरासह ग्रामीण भागातील वाजेगाव, धनेगाव, तुप्पा आणि विष्णुपुरी यांसह अनेक गावांमध्ये बंद शांततेत पाळण्यात आला. अनुचित प्रकार घडू नये यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व ग्रामीण पोलीस ठाण्याच्या पथकाने विविध ठिकाणी कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात केला होता.

# जात पडताळणी समितीवर कुणीही दबाव आणू नये -छगन भुजबळ


**मुंबई (प्रतिनिधी)–** जात पडताळणी समिती ही महत्त्वाची समिती आहे. त्याच्यावर कुणीही दबाव आणता कामा नये. काही प्रमाणपत्र जात पडताळणी समितीने नाकारली आहेत. ती दुरुस्त करून देतो, असं काही आमदार म्हणाले आहेत. आता माझा त्या आमदारांना सवाल आहे की, मुंबईत ४ नगरसेवकांचं जात पडळणीत प्रमाणपत्र रद्द ठरलं आहे. त्यामुळे त्यांचं नगरसेवक पद गेलं आहे. आता ते देखील तुम्ही दुरुस्त करून देणार आहात का? असे म्हणत छगन भुजबळ यांनी प्रसाद लाड यांना टोला लगावला.

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला सात दिवस झाले असून, त्यांनी सरकारला ११ तारखेपर्यंत सर्व मागण्या मान्य करण्याचा अल्टिमेटम दिला आहे.

### भुजबळांनी परिवारा पलीकडे काय केलं –जरांगे

या वयात भुजबळ यांनी स्वतःचं राजकारण पाहावं, पुतण्याला खासदार कसं करता येतं ते पाहावं. ओबीसींच्या नावावर त्यांनी सगळं खाल्लं. वेळ पाहून कधी महाविकास आघाडीमध्ये जातात, कधी महायुतीमध्ये जातात, कधी अजितदादांसोबत जातात. यांनी ओबीसी महमंडळ खाल्लं, महाराष्ट्र सदनही सोडलं नाही, अशी टीका मनोज जरांगे यांनी छगन भुजबळ यांच्यावर केली.

गुरूवारी मंत्री राधाकृष्ण विखे–पाटील, मंत्री उदय सामंत आणि भाजप आमदार (**पान ६ वर...**)




# भारत–जपान पहिल्यांदाच क्रिकेटच्या मैदानावर; २२ सप्टेंबरला ऐतिहासिक टी–२० सामना

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) शुक्रवार, ४ सप्टेंबर रोजी एक मोठी घोषणा केली. बीसीसीआयच्या म्हणण्यानुसार, आशियाई क्रीडा स्पर्धेतील आपल्या मोहिमेला सुरुवात करण्यापूर्वी, भारतीय पुरुष क्रिकेट संघ जपानविरुद्ध एक ऐतिहासिक टी–२० सामना खेळणार आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेतील भारताचा पहिला सामना २८ सप्टेंबर रोजी होणार असून, जपानविरुद्धचा हा सामना त्यापूर्वी अवघ्या सहा दिवसांनी, म्हणजेच २२ सप्टेंबर रोजी खेळला जाईल. पुरुष क्रिकेटच्या इतिहासात भारतीय आणि जपानी संघ आमनेसामने येण्याची ही पहिलीच वेळ असेल.

बीसीसीआयने आपल्या अधिकृत ट्विटर हँडलवर जाहीर केले आहे की, भारत आणि जपान यांच्यातील संबंधांच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त या ऐतिहासिक टी२० सामन्याचे आयोजन करण्यात आले आहे. मंडळाने शेअर केलेल्या फोटोनुसार, हा सामना मंगळवार, २२ सप्टेंबर रोजी जपानमधील तोचिगी प्रांतातील सानो आंतरराष्ट्रीय क्रिकेट मैदानावर खेळला जाईल. सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार सकाळी ९:३० वाजता सुरू होईल.

# कायदा– सुव्यवस्थेसाठी कठोर कारवाई; वाळू माफिया, मटका किंगसह ८ जणांवर हद्दपारीची कुऱ्हाड

## गणेशोत्सव दरम्यान अजून कांही सराईत गुन्हेगार एसपींच्या रडारवर

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था आणि सार्वजनिक शांतता अबाधित राखण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी ८ सराईत गुन्हेगारांवर हद्दपारीची कारवाई केली आहे. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५५ अन्वये ही कारवाई करण्यात आली आहे.

नांदेड ग्रामीण (२), इतवारा (१) व किनवट (१) पोलीस ठाण्यांनी पाठवलेल्या प्रस्तावांचा विचार करून डॉ. निलाभ यांनी २ जणांना ६ महिने आणि ६ जणांना १२ महिन्यांसाठी जिल्ह्यातून हद्दपार करण्याचे आदेश दिले आहेत.

**हद्दपार केलेले आरोपी :** नांदेड ग्रामीण हद्दीतील शिवाजी देविदास जाधव (वय ३६, रा. वांगी) व परमेश्वर मारोती बोचरे (वय ४०, रा. वांगी) – १२ महिन्यांसाठी दोघांवर अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीचे गुन्हे.

नांदेड ग्रामीण हद्दीतील मोहम्मद इरफान मोहम्मद गौस (वय ४०) व मोहम्मद फैजान मोहम्मद गौस (वय ३२), दोघे रा. हबीबिया कॉलनी – १२ महिन्यांसाठी. इरफानवर ६ गुन्हे (२४६/२०१३, ८७५/२०२०, २५९/२०२१, ९३३/२०२४, ६८९/२०२५, ८९४/२०२६) तर फैजानवर ३ गुन्हे यांना हद्दपार करण्यात आले आहे. किनवट हद्दीतील शेख सोहेल शेख शौकत उर्फ गाज्या (वय २१) व शेख सलमान उर्फ सल्ला महेबुब शेख (वय २६), दोघे रा. चिखली बु. यांना १२ महिन्यांसाठी, मोटारसायकल व सायकल चोरी, मालमत्तेविरुद्धचे गुन्हे दाखल असलेल्यांना हद्दपार करण्यात आले आहे.

इतवारा ठाण्याच्या हद्दीतील मजहर खान आरेफ खान (वय ३२) व खालेद खान आरिफ खान (वय ३५), दोघे रा. मोहसीन कॉलनी, देगलूर नाका यांना ६ महिन्यांसाठी. २०१९ ते २०२५ दरम्यान ६ गंभीर गुन्हे, मटका, मारहाण, शिवीगाळचे गुन्हे दाखल आहेत, त्यांना हद्दपार करण्यात आले आहे.

पोलीस ठाण्यांनी प्रस्ताव सादर केल्यानंतर उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांनी चौकशी केली. संबंधितांना नोटीस देऊन म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली. प्रतिबंधात्मक कारवाईनंतरही वर्तनात सुधारणा न झाल्याने व त्यांच्या हालचालींमुळे सार्वजनिक शांततेला धोका असल्याने एसपी डॉ. निलाभ रोहन यांनी हद्दपारीचे आदेश पारित केले आहेत. आदेशानंतर या इसमांना निर्धारित वेळेत जिल्ह्याबाहेर जाणे बंधनकारक असून कालावधीत अटींचे पालन करावे लागणार आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# शिक्षकदिनाच्या निमित्ताने...

आज शिक्षकदिन आहे. तो पूर्वीसारखा आर्थिकदृष्ट्या दीन राहिला नाही, परंतु अधिकाराने मात्र दीन झाला आहे. कारण राष्ट्राचे भविष्य संसदेत किंवा मंत्रालयाच्या वातानुकूलित दालनात घडत नाही; ते शाळेच्या वर्गखोलीत घडते. त्या वर्गखोलीत उभा असलेला शिक्षक हा केवळ पगार घेणारा सरकारी कर्मचारी नसतो, तर हजारो विद्यार्थ्यांच्या भविष्याचा शिल्पकार असतो, याचा विचार करायला शासन आणि समाज तयार नाही. शिक्षकाची भूमिका जितकी महान, तितकीच त्याची चूक धोकादायक! एका डॉक्टरच्या चुकीने एखाद्या व्यक्तीचे नुकसान होऊ शकते; पण एका शिक्षकाच्या चुकीच्या विचारांनी संपूर्ण पिढीचे नुकसान होऊ शकते. दुर्दैवाने, आज याच पवित्र क्षेत्राला अनेक प्रश्नांनी घेरले आहे. शिक्षण सेवा राहिले आहे की व्यवसाय? शिक्षक हा आदर्श राहिला आहे की केवळ नोकरी करणारा कर्मचारी? सरकारी शिक्षणव्यवस्थेवर विश्वास ठेवण्याची जबाबदारी असलेलेच लोक आपल्या मुलांना खासगी शाळांमध्ये का पाठवतात? हे प्रश्न आता टाळून चालणार नाहीत. शिक्षक म्हणजे विषयाचे ज्ञान देणारा माणूस एवढीच त्याची ओळख नाही. तो विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला घडवणारा असतो. त्याच्यात ज्ञान, संयम, प्रामाणिकपणा, चारित्र्य, संवेदनशीलता, संशोधनवृत्ती, सर्जनशीलता आणि समानतेची दृष्टी असणे अपेक्षित आहे. विद्यार्थ्याची आर्थिक, सामाजिक किंवा कौटुंबिक पार्श्वभूमी काहीही असो, प्रत्येक विद्यार्थ्याकडे समानतेने पाहणे ही शिक्षकाची नैतिक जबाबदारी आहे. पण आज शिक्षणव्यवस्थेत काही ठिकाणी या मूल्यांची जागा व्यवहाराने घेतल्याचे चित्र दिसते. शिक्षक भरतीतील कथित गैरव्यवहार, बनावट कागदपत्रे, खोटी विद्यार्थीसंख्या, अनुदानातील अनियमितता आणि नियुक्त्यांभोवती फिरणाऱ्या भ्रष्टाचाराच्या तक्रारी या शिक्षणव्यवस्थेच्या मुळावर घाव घालणाऱ्या बाबी आहेत. पात्रता असूनही एखाद्या गरीब आणि प्रामाणिक तरुणाला केवळ पैशाची किंवा राजकीय ओळखीची ताकद नसल्यामुळे संधी मिळत नसेल, तर ही केवळ त्या तरुणाची हार नाही; ती संपूर्ण व्यवस्थेची नैतिक दिवाळखोरी आहे. सरकारी शिक्षणव्यवस्थेवर कोट्यवधी रुपये खर्च केले जातात. मग या व्यवस्थेतील शिक्षक, अधिकारी आणि समाजातील प्रभावशाली घटक स्वतःच्या मुलांसाठी खासगी शिक्षणाला प्राधान्य देत असतील, तर सरकारने स्वतःला एक साधा प्रश्न विचारला पाहिजे की, सरकारी शिक्षणव्यवस्थेवर विश्वास कोण ठेवणार? सरकारी शाळांमध्ये गुणवत्ता निर्माण करण्याऐवजी केवळ योजना, उद्घाटने, डिजिटल फलक आणि कागदी अहवालांची गर्दी करून शिक्षण सुधारणार नाही. वर्गात शिक्षक उपस्थित आहे का, तो विद्यार्थ्यांशी संवाद साधतो का, विद्यार्थ्यांच्या क्षमता ओळखतो का आणि त्याला शिक्षणाबद्दल खरोखर आस्था आहे का, याची उत्तरे शोधावी लागतील. आणखी एक धोकादायक बदल म्हणजे शिक्षक आणि विद्यार्थ्यांमधील नाते. पूर्वी शिस्तीच्या नावाखाली विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षा करणे स्वीकारले जात होते. आज ती पद्धत कायदेशीर आणि नैतिकदृष्ट्या अस्वीकार्य आहे. पण त्याच्या उलट टोकालाही जाता येणार नाही. शिक्षकाने विद्यार्थ्याला शिस्त लावली म्हणून तो गुन्हेगार आणि विद्यार्थ्याने शिक्षकाला धमकावले म्हणून ते 'वयाचे कारण', अशी दुटप्पी मानसिकता चालणार नाही. शाळेत शिक्षकाचा सन्मान आणि विद्यार्थ्याचा अधिकार, दोन्ही अबाधित राहिले पाहिजेत. विद्यार्थ्यांवर हिंसा नको; पण शिक्षकांवरील हिंसाही खपवून घेता कामा नये. संवाद, समुपदेशन आणि मूल्यशिक्षणाच्या माध्यमातून शिस्त निर्माण करण्याची जबाबदारी शाळांनी स्वीकारली पाहिजे. आज खाजगी कोचिंग क्लासमुळे शिक्षणाचा बाजार झाला आहे. त्यामुळे शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या पवित्र नात्याला बाधा आली आहे. बालगुन्हेगारी वाढत असल्याच्या आकडेवारीकडेही गांभीर्याने पाहण्याची वेळ आली आहे. मुलांच्या हातात महागडी उपकरणे आहेत; पण त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी पालकांकडे वेळ नाही. शाळेत शिक्षक आहेत; पण त्यांच्या कामावर प्रशासकीय आणि शैक्षणिक दबाव वाढत आहे. सोशल मीडिया मुलांच्या विचारविश्वावर प्रभाव टाकत आहे; पण त्यांना योग्य-अयोग्य समजावून सांगणारी यंत्रणा कमकुवत आहे. अशा परिस्थितीत मुलांच्या मानसिकतेत निर्माण होणारा असंतोष गुन्हेगारीकडे वळला तर दोष कोणाचा? पालकांचा निष्काळजीपणा, शिक्षकांचा व्यावसायिक दृष्टिकोन आणि व्यवस्थेचे अपयश, या तिन्हींची किंमत अखेर समाजाला मोजावी लागते. म्हणूनच सरकारने आता केवळ 'शिक्षण सुधारणा'च्या घोषणा करण्यापेक्षा कठोर निर्णय घेण्याची वेळ आली आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षकांना प्रोत्साहन आणि विद्यार्थ्यांच्या हिताकडे दुर्लक्ष करणाऱ्यांना उत्तरदायित्व, हे तत्त्व लागू झाले पाहिजे. शिक्षकांना सन्मान द्या, पण अंध सन्मान नको. शिक्षक हा राष्ट्रनिर्माता आहे, म्हणून त्याच्याकडून राष्ट्रनिर्मितीचीच अपेक्षा असली पाहिजे. पगार, सुविधा आणि अधिकार यांच्यासोबत कर्तव्य आणि उत्तरदायित्वही असले पाहिजे. कारण आज शिक्षणव्यवस्थेसमोरचा प्रश्न केवळ शिक्षकांचा नाही. हा प्रश्न महाराष्ट्राच्या आणि देशाच्या भवितव्याचा आहे. वर्गखोलीतून डॉक्टर, अभियंते, प्रशासकीय अधिकारी आणि उद्योजक तयार होतात; पण त्याच वर्गखोलीतून माणूसही तयार झाला पाहिजे. माणूस घडविण्यात शिक्षण अपयशी ठरले, तर कितीही पदव्या, कितीही तंत्रज्ञान आणि कितीही मोठ्या शैक्षणिक इमारती उभारल्या तरी त्या समाजाच्या नैतिक अधःपतनाला थांबवू शकणार नाहीत. आता सरकारने, शिक्षकांनी, पालकांनी आणि समाजाने स्वतःला एकच प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे की आपण पुढची पिढी घडवत आहोत की, तिच्या हातात विनाशाची साधने देत आहोत? या प्रश्नाचे उत्तर आज द्यावे लागेल. कारण उद्याची पिढी आपल्याला माफ करेलच, याची कोणतीही हमी नाही.

# शिक्षक : ज्ञानदानातून राष्ट्रनिर्मिती करणारा शिल्पकार

५ सप्टेंबर हा दिवस संपूर्ण भारतात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. भारताचे महान तत्त्वज्ञ, शिक्षणतज्ज्ञ आणि माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस शिक्षकांना समर्पित करण्यात आला आहे. शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याबरोबरच शिक्षणाचे आणि शिक्षकांच्या भूमिकेचे समाजातील महत्त्व अधोरेखित करण्याचा हा दिवस आहे. शिक्षक दिन हा केवळ शुभेच्छा देण्याचा किंवा औपचारिक कार्यक्रमांचा दिवस नसून, शिक्षकांच्या योगदानाचा आणि राष्ट्रनिर्मितीतील त्यांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेचा विचार करण्याचा दिवस आहे.



शिक्षक हा केवळ विद्यार्थ्यांना पुस्तकातील धडे शिकवणारा व्यक्ती नसतो, तर तो विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारा शिल्पकार असतो. आई-वडिलांनंतर मुलांच्या जीवनावर सर्वाधिक प्रभाव टाकणाऱ्या व्यक्तींमध्ये शिक्षकांचा समावेश होतो. विद्यार्थ्यांच्या मनात ज्ञानाची जिज्ञासा निर्माण करणे, त्यांना योग्य-अयोग्याची जाणीव करून देणे, आत्मविश्वास वाढविणे, शिस्त लावणे आणि समाजाप्रती जबाबदारीची भावना निर्माण करणे, हे शिक्षकांचे महत्त्वपूर्ण कार्य आहे. म्हणूनच शिक्षकाला समाजात केवळ 'शिक्षक' म्हणून नव्हे, तर भावी पिढीचा मार्गदर्शक म्हणून पाहिले जाते.

भारतीय संस्कृतीत गुरूला अनन्यसाधारण महत्त्व आहे. 'गुरू' म्हणजे अज्ञानाचा अंधार दूर करून ज्ञानाचा प्रकाश दाखविणारा. पूर्वीच्या गुरुकुल परंपरेत गुरू-शिष्य नाते अत्यंत पवित्र मानले जात होते. गुरू केवळ शिक्षण देत नव्हते, तर शिष्याला जीवन जगण्याची कला, कर्तव्याची जाणीव, संयम, शिस्त आणि मूल्यांची शिकवण देत होते. काळ बदलला, शिक्षणाच्या पद्धती बदलल्या आणि तंत्रज्ञानाने शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणले. मात्र गुरूचे महत्त्व आजही कमी झालेले नाही.

आज मोबाईल, इंटरनेट, संगणक आणि कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे माहितीचा प्रचंड साठा विद्यार्थ्यांच्या हातात उपलब्ध आहे. काही सेकंदांत जगभरातील माहिती मिळू शकते. त्यामुळे शिक्षकाची भूमिका केवळ माहिती देण्यापुरती राहिलेली नाही. उपलब्ध माहितीचे विश्लेषण कसे करावे, योग्य आणि अयोग्य माहितीतील फरक कसा ओळखावा, अफवा आणि तथ्य यांची चिकित्सा कशी करावी, तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर कसा करावा, हे शिकविणे अधिक महत्त्वाचे झाले आहे. या बदलत्या परिस्थितीत शिक्षक हा विद्यार्थ्यांचा मार्गदर्शक, समुपदेशक आणि मूल्यशिक्षक म्हणून अधिक महत्त्वाचा ठरतो.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे स्वतः एक महान शिक्षक आणि शिक्षणतज्ज्ञ होते. शिक्षणाच्या माध्यमातून समाज आणि राष्ट्र घडविण्याची शक्ती त्यांनी ओळखली होती. शिक्षक ते राष्ट्रपती असा त्यांचा प्रेरणादायी प्रवास त्यांच्या असामान्य कर्तृत्वाची साक्ष देतो. त्यांच्या कार्याचा आणि विचारांचा सन्मान करण्यासाठी साजरा होणारा शिक्षक दिन प्रत्येक शिक्षकाच्या योगदानाची जाणीव करून देतो.

आज शिक्षण क्षेत्रासमोर अनेक आव्हाने उभी आहेत. विद्यार्थ्यांवरील वाढता शैक्षणिक ताण, स्पर्धेची मानसिकता, सोशल मीडियाचा वाढता प्रभाव, मोबाईलचे व्यसन, बदलती कौटुंबिक परिस्थिती आणि नैतिक मूल्यांपासून दूर जाण्याची प्रवृत्ती यामुळे शिक्षकांची जबाबदारी अधिक वाढली आहे. विद्यार्थ्यांना केवळ चांगले गुण मिळवून देणे हे शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट असू शकत नाही. त्यांच्यामध्ये माणुसकी, संवेदनशीलता, प्रामाणिकपणा, सहकार्याची भावना, पर्यावरणाबद्दलची जाणीव आणि सामाजिक बांधिलकी निर्माण करणेही तितकेच आवश्यक आहे.

आजच्या काळात शिक्षकांनी स्वतःलाही सतत अद्ययावत ठेवणे गरजेचे आहे. नवनवीन तंत्रज्ञान, डिजिटल शिक्षणपद्धती आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा योग्य वापर करून अध्यापन अधिक परिणामकारक करता येऊ शकते. मात्र तंत्रज्ञान हे शिक्षकाची जागा घेणारे साधन नसून शिक्षकाला अधिक सक्षम करणारे माध्यम आहे, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या मनातील प्रश्न समजून घेणे, त्यांच्या अडचणी जाणून घेणे आणि त्यांना योग्य दिशा देणे हे मानवी नाते तंत्रज्ञान कधीही पूर्णपणे बदलू शकत नाही.

शिक्षकांच्या कार्याचा सन्मान केवळ शिक्षक दिनाच्या दिवशी पुष्पगुच्छ देऊन किंवा शुभेच्छा संदेश पाठवून होऊ शकत नाही. शिक्षकांना समाजात योग्य प्रतिष्ठा, सुरक्षित आणि सन्मानजनक कार्यपरिसर, आवश्यक शैक्षणिक साधने आणि प्रशिक्षणाच्या संधी मिळणे आवश्यक आहे. शिक्षकांवर अनावश्यक प्रशासकीय कामांचा भार टाकण्यापेक्षा त्यांना अध्यापनासाठी अधिक वेळ आणि स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. कारण शिक्षक जितका सक्षम असेल, तितकी भावी पिढी अधिक सक्षम होईल.

विद्यार्थ्यांच्या जीवनात काही शिक्षक कायमचे लक्षात राहतात. त्यांच्या एखाद्या वाक्याने, दिलेल्या प्रोत्साहनाने किंवा दाखविलेल्या योग्य मार्गाने विद्यार्थ्याचे संपूर्ण आयुष्य बदलू शकते. एखादा विद्यार्थी अडचणीत असताना त्याच्या पाठीशी उभा राहणारा शिक्षक त्याच्यासाठी केवळ शिक्षक राहत नाही, तर आयुष्यभराचा मार्गदर्शक बनतो. म्हणूनच अनेक यशस्वी व्यक्ती आपल्या यशाचे श्रेय आपल्या आई-वडिलांबरोबरच शिक्षकांनाही देताना दिसतात.


शिक्षण म्हणजे केवळ परीक्षा, गुण आणि प्रमाणपत्रे नव्हेत. शिक्षण म्हणजे विचार करण्याची क्षमता, प्रश्न विचारण्याचे धैर्य, निर्णय घेण्याची विवेकबुद्धी आणि जबाबदारीने जगण्याची जाणीव होय. या सर्व गोष्टी विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्याचे कार्य शिक्षक करतात. त्यामुळे शिक्षक हा समाजाच्या भविष्याचा शिल्पकार आहे, असे म्हटले तर ते अतिशयोक्ती ठरणार नाही. शिक्षक घडवतो विद्यार्थी, विद्यार्थी घडवतो समाज आणि समाज घडवतो राष्ट्र. त्यामुळे शिक्षकांचा सन्मान हा केवळ एका दिवसापुरता मर्यादित न राहता वर्षभर त्यांच्या कार्याचा आदर केला पाहिजे. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील विश्वासाचे नाते अधिक दृढ झाले पाहिजे. पालक, शिक्षक आणि समाज या तिन्ही घटकांनी एकत्रितपणे काम केल्यासच संस्कारक्षम, विवेकी आणि जबाबदार पिढी घडू शकते.

आज शिक्षक दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने आपल्या जीवनात दिशा देणाऱ्या शिक्षकांचे स्मरण करावे. त्यांच्या शिकवणीतील एखादा संस्कार आपल्या आचरणात आणणे, हाच त्यांच्याप्रती खरा आदर ठरेल. ज्ञानाचा दीप तेवत ठेवणाऱ्या, अज्ञानाचा अंधार दूर करणाऱ्या आणि विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना पंख देणाऱ्या सर्व शिक्षकांना मनःपूर्वक अभिवादन!

शिक्षक म्हणजे ज्ञानाचा दीप, संस्कारांची शिदोरी आणि राष्ट्रनिर्मितीचा भक्कम आधारस्तंभ. शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे

# एआय आणि शिक्षक!



**शिक्षकाची भूमिका संपणार की बदलणार?**

एक काळ होता, जेव्हा विद्यार्थ्याच्या ज्ञानाची खिडकी म्हणजे शाळा आणि त्या खिडकीची चावी म्हणजे शिक्षक. शिक्षक सांगायचे, विद्यार्थी ऐकायचे; शिक्षक शिकवायचे, विद्यार्थी शिकायचे. आज मात्र एका मोबाईलच्या पडद्यावर जगभरातील माहिती उपलब्ध आहे. प्रश्न विचारला की काही क्षणांत उत्तर मिळते. निबंध हवा, कविता हवी, गणिताचे उदाहरण सोडवायचे असो किंवा एखादा विषय समजून घ्यायचा असोकृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच ख क्षणार्धात मदतीला धावून येते. मग साहजिकच प्रश्न निर्माण होतो. एआयच्या युगात शिक्षकाची गरज उरणार आहे का? उत्तर स्पष्ट आहेशिक्षकाची भूमिका संपणार नाही; उलट ती अधिक महत्त्वाची आणि अधिक जबाबदारीची होणार आहे.

भारताच्या शिक्षणव्यवस्थेतही हा बदल आता प्रत्यक्ष दिसू लागला आहे. २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून CBSE अंतर्गत इयत्ता तिसरी ते आठवीसाठी Computational Thinking आणि Artificial Intelligence विषयाशी संबंधित अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे.

शिक्षकांना एआयच्या प्रभावी वापरासाठी प्रशिक्षण देण्यासाठी डथधच् झश्रींसारख्या माध्यमातून विशेष अभ्यासक्रमही उपलब्ध करून देण्यात आले आहेत. म्हणजेच प्रश्न आता 'एआय येणार का?' हा राहिलेला नाही; प्रश्न आहे'ख सोबत शिक्षक कसा बदलेल?'

**माहिती देणारा नव्हे, दिशा देणारा शिक्षक**

ख विद्यार्थ्याला माहिती देऊ शकतो; पण त्या माहितीचा अर्थ काय, तिची सत्यता किती आणि तिचा उपयोग कसा करायचा, हे शिकविण्याची जबाबदारी शिक्षकाचीच आहे. आज विद्यार्थ्याला उत्तर मिळणे कठीण नाही. योग्य प्रश्न विचारणे मात्र कठीण आहे.

एआय हजारो पर्याय देऊ शकते; पण त्यातून योग्य पर्याय निवडण्याची विवेकबुद्धी विद्यार्थ्यामध्ये निर्माण करणे हे शिक्षकाचे काम आहे. म्हणून भविष्यातील शिक्षक हा केवळ 'ज्ञान देणारा' राहणार नाही, तर ज्ञानाचा मार्गदर्शक, विचारांचा शिल्पकार आणि विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्त्वाचा घडविणारा असेल. एआय माहिती देईल; संस्कार कोण देणार? यंत्राकडे माहिती असते; माणसाकडे भावना असतात. एआय विद्यार्थ्याला गणित शिकवू शकते, भाषा सुधारू शकते, चित्र तयार करू शकते, अभ्यासाची रूपरेषा देऊ शकते. पण एखादा विद्यार्थी निराश झाला आहे, त्याचा आत्मविश्वास खचला आहे, तो घरच्या समस्यांमुळे अस्वस्थ आहेहे ओळखून त्याच्या खांद्यावर हात ठेवणारा कोण? तो शिक्षकच. 'तू हे करू शकतोस', 'अपयश म्हणजे शेवट नाही', 'प्रामाणिकपणे प्रयत्न कर'या चार वाक्यांत एखाद्या विद्यार्थ्याचे आयुष्य बदलण्याची ताकद असते. ही ताकद कोणत्याही यंत्रात निर्माण करणे अजूनही शक्य झालेले नाही.

**एआय शिक्षकाचा प्रतिस्पर्धी नव्हे, सहकारी**

एआयकडे शिक्षकाने भीतीने पाहण्याची गरज नाही. उलट एआय हे शिक्षकाचे प्रभावी साधन बनू शकते. धडा अधिक आकर्षक कसा करायचा, विद्यार्थ्यांच्या पातळीनुसार वेगवेगळ्या पद्धतीने विषय कसा समजावायचा, प्रश्नपत्रिका किंवा सराव साहित्य कसे तयार करायचे, विद्यार्थ्यांच्या चुका कशा ओळखायच्यायामध्ये एआय शिक्षकाला मदत करू शकते.

भारताच्या शिक्षण मंत्रालयाच्या चर्चांमध्येही एआयचा उपयोग वैयक्तिकृत शिक्षण, शिक्षकांना मदत आणि विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या गरजेनुसार मार्गदर्शन करण्यासाठी करण्यावर भर देण्यात आला आहे. म्हणून भविष्यात ख वापरणारा शिक्षक आणि ख न वापरणारा शिक्षक यांच्यात फरक पडू शकतो; पण ख आणि शिक्षक यांच्यातील स्पर्धा ही योग्य दिशा नाही. स्पर्धा असावी तीख च्या मदतीने विद्यार्थ्याला अधिक चांगले शिकविण्याची!

**मात्र एक धोका आहे...**

एआयचा अतिरेक झाला तर विद्यार्थी विचार करणे विसरू शकतो.गृहपाठ ख कडून करून घेणे, निबंध तयार करून घेणे, उत्तर पाठ करून घेणे आणि स्वतःच्या बुद्धीचा वापर न करणेही सवय विद्यार्थ्याच्या सर्जनशीलतेसाठी धोकादायक ठरू शकते. म्हणून एआय वापरण्यापेक्षा एआयचा जबाबदारीने वापर कसा करायचा, हे शिकविणे अधिक महत्त्वाचे आहे.

विद्यार्थ्याने एआयला 'उत्तर देणारे यंत्र' न मानता 'विचार करण्यासाठी मदत करणारे साधन' मानले पाहिजे. शिक्षकाची खरी परीक्षा आता सुरू! पूर्वी शिक्षकाच्या ज्ञानाची परीक्षा घेतली जायची. आता शिक्षकाच्या बदलाशी जुळवून घेण्याच्या क्षमतेची परीक्षा होणार आहे.नवीन तंत्रज्ञान शिकण्याची तयारी, एआयच्या मर्यादा समजून घेणे, विद्यार्थ्यांना डिजिटल शिस्त लावणे, माहितीची सत्यता तपासायला शिकवणे आणि तंत्रज्ञानासोबत मानवी मूल्ये जपणेही भविष्यातील शिक्षकाची नवी जबाबदारी आहे. शिक्षकाने ख शिकले पाहिजे; पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे ख पेक्षा माणूस मोठा आहे, हे विद्यार्थ्याला शिकवले पाहिजे.

**शाळा स्मार्ट नव्हे, विद्यार्थी स्मार्ट हवेत!**

आज 'स्मार्ट क्लासरूम'ची चर्चा होते. पण फक्त डिजिटल फळा, प्रोजेक्टर, इंटरनेट आणि एआय साधने आली म्हणून शिक्षण स्मार्ट होत नाही. स्मार्ट शिक्षण म्हणजे प्रश्न विचारणारा विद्यार्थी, विचार करणारा विद्यार्थी, चूक स्वीकारून पुन्हा प्रयत्न करणारा विद्यार्थी आणि समाजासाठी संवेदनशील असणारा विद्यार्थी. तंत्रज्ञान साधन देऊ शकते; पण ध्येय शिक्षकानेच दाखवायचे आहे.

शेवटी... एआय कदाचित शिक्षकाचा बराचसा प्रशासकीय आणि पुनरावृत्तीचा भार कमी करेल. विद्यार्थ्यांना वैयक्तिक मदत देण्यातही ते उपयोगी ठरेल. पण शिक्षणाचा अंतिम उद्देश केवळ माहिती देणे नाही; माणूस घडवणे हा आहे.

माहितीच्या महासागरात पोहायला शिकवणारे अनेक तंत्रज्ञान उपलब्ध होतील; पण त्या महासागरात कोणत्या दिशेने पोहायचे, हे सांगणारा शिक्षक आवश्यकच राहील. म्हणून भविष्यात प्रश्न असा नसणार.

**एआय शिक्षकाची जागा घेईल का?**

खरा प्रश्न असा असेल एआयच्या मदतीने शिक्षक विद्यार्थ्यांना किती अधिक सक्षम, विवेकी आणि माणूस म्हणून घडवू शकतो? कारण, एआय बुद्धिमत्ता देऊ शकते; पण शिक्षक विवेक देतो. एआय माहिती देऊ शकते; पण शिक्षक दिशा देतो. एआय उत्तर देऊ शकते; पण शिक्षक योग्य प्रश्न विचारायला शिकवतो, आणि म्हणूनच एआयचे युग आले म्हणून शिक्षक संपणार नाही; तर शिक्षकाचे खरे महत्त्व आता नव्याने सिद्ध होणार आहे!

**-पंडित रावजी पवळे,**
नांदेड
मो.९८९०२३२९६२

# शिक्षक दिन साजरा करताना...!

५ सप्टेंबर हा भारताचे माजी राष्ट्रपती, तत्त्वज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस. त्यांची शिक्षणाविषयीची निष्ठा आणि शिक्षकांविषयीचा आदर लक्षात घेऊन देशभर हा दिवस 'शिक्षकदिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवशी शाळांमध्ये कार्यक्रम होतात, शिक्षकांचा सत्कार होतो, विद्यार्थ्यांकडून शुभेच्छांचा वर्षाव होतो. परंतु शिक्षकदिन केवळ अभिनंदनाचा आणि औपचारिक सत्काराचा दिवस न राहता आपल्या शिक्षण व्यवस्थेच्या आरोग्याची तपासणी करण्याचा दिवस झाला पाहिजे. आज महाराष्ट्राची शिक्षणव्यवस्था एका मोठ्या संक्रमणाच्या टप्प्यावर आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, राज्य अभ्यासक्रम आराखडा २०२४, कौशल्याधारित शिक्षण, अनुभवाधारीत अध्ययन, तंत्रज्ञानाचा वापर, डिजिटल शिक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता, शाळा गुणवत्ता मूल्यांकन अशा अनेक नव्या संकल्पना शिक्षणव्यवस्थेत प्रवेश करत आहेत. मात्र प्रश्न असा आहे. या बदलांचा खरा परिणाम वर्ग खोलीत किती दिसतो आहे?

**महाराष्ट्राचे शिक्षण : यश आणि आव्हाने**

महाराष्ट्र हे शैक्षणिकदृष्ट्या प्रगत राज्य मानले जाते.उच्च शिक्षणाच्या संस्था, नामांकित विद्यापीठे, संशोधन संस्था, व्यावसायिक शिक्षणाच्या संधी आणि मोठी शैक्षणिक पायाभूत रचना ही महाराष्ट्राची जमेची बाजू आहे.

महाराष्ट्रातील ग्रामीण भागातही अनेक शिक्षक अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत नावीन्यपूर्ण प्रयोग करत आहेत. कमी साधनांमध्ये विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला चालना देणाऱ्या अनेक शाळा आदर्श निर्माण करत आहेत.मात्र या सकारात्मक चित्रा सोबत काही गंभीर प्रश्नही आहेत. मुलांच्या मूलभूत वाचन-लेखन क्षमतेचे काय? गणितीय कौशल्यांचे काय?

**शाळा सोडणाऱ्या विद्यार्थ्यांचे काय?**

ग्रामीण-शहरी शैक्षणिकदरीचे काय? सरकारी आणि खासगी शिक्षणातील मानसिकदरीचे काय? आणि सर्वांत महत्त्वाचे शिक्षकाला अपेक्षित शैक्षणिक वातावरण मिळते आहे का? याच प्रश्नांच्या उत्तरात महाराष्ट्राच्या शिक्षणाचे खरे वास्तव दडलेले आहे.

**विश्लेषण : महाराष्ट्राचे शिक्षण नेमके कुठे चुकते?**

परीक्षा केंद्रस्थानी, विद्यार्थी परिघावर आपल्या




शिक्षण व्यवस्थेतील सर्वांत मोठा विरोधाभास म्हणजे विद्यार्थ्याच्या शिकण्यापेक्षा परीक्षेतील कामगिरीला अधिक महत्त्व मिळणे. गुण मिळविण्यासाठी पाठांतर, प्रश्नसंच, सराव परीक्षा आणि अपेक्षित उत्तरांचा सराव यावर भर दिला जातो. परंतु जीवनात केवळ पाठांतर उपयोगी पडत नाही. जीवन विचारायला शिकवते, प्रश्न सोडवायला शिकवते, निर्णय घ्यायला शिकवते, अपयश स्वीकारायला शिकवते आणि परिस्थितीनुसार बदलायला शिकवते. म्हणून शिक्षणाने विद्यार्थ्याला विचारणारा, शोधणारा आणि प्रयोग करणारा बनविले पाहिजे. गुण महत्त्वाचे आहेत; पण गु गुणांपेक्षा गुणात्मक विकास अधिक महत्त्वाचा आहे.

**मूलभूत शिक्षण :** पुढील शिक्षणाचा पाया इयत्ता पहिली ते पाचवी हा विद्यार्थ्याच्या शैक्षणिक विकासाचा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे.या काळात मुलाला सहज आणि अर्थपूर्ण वाचन करता येणे, स्वतःचे विचार लिहिता येणे, मूलभूत गणितीय क्रिया करता येणे, निरीक्षण करता येणे, प्रश्न विचारता येणे, अनुभवातून शिकता येणे ही कौशल्ये आत्मसात झाली पाहिजेत. पाया कमकुवत असेल तर पुढील इमारत कितीही सुंदर असली तरी ती टिकाऊ राहणार नाही.म्हणूनच 'मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान' हा केवळ शासकीय कार्यक्रम न राहता प्रत्येक शाळेचा आणि प्रत्येक शिक्षकाचा मूलभूत शैक्षणिक संकल्प झाला पाहिजे. ग्रामीण आणि शहरी शिक्षणातील दरी:महाराष्ट्राच्या शैक्षणिक वास्तवाचे विश्लेषण करताना ग्रामीण-शहरी दरीकडे दुर्लक्ष करता येणार नाही. शहरी विद्यार्थ्याला ग्रंथालय, इंटरनेट, विविध क्लासेस, शैक्षणिक साधने, तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि विविध प्रकारच्या अध्ययन संधी उपलब्ध असतात. ग्रामीण किंवा दुर्गम भागातील विद्यार्थ्याला अनेकदा मर्यादित साधनांमध्येच शिकावे लागते. मात्र या ठिकाणी एक महत्त्वाचा मुद्दा लक्षात घ्यायला हवा, शाळेतील शिक्षण आणि घरातील वातावरण यांच्यात मोठी दरी असेल तर विद्यार्थ्याचा विकास अपूर्ण राहतो.पालकांनी केवळ किती मार्क मिळाले?हा प्रश्न विचारण्या ऐवजीआज काय नवीन शिकलास? तुला काय समजले नाही?तू कोणता प्रश्न विचारलास?असे प्रश्न विचारण्याची संस्कृती निर्माण केली पाहिजे.

पालक, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यात विश्वासाचे नाते निर्माण झाले तर शिक्षण अधिक प्रभावी होईल. शिक्षक दिनाच्या दिवशी शिक्षकांचा सत्कार करणे ही चांगली परंपरा आहे. पण शिक्षकाचा खरा सन्मान म्हणजे त्याच्यावर विश्वास ठेवणे. त्याला अध्यापनासाठी वेळ देणे. आवश्यक साधने उपलब्ध करुन देणे.नाविन्यपूर्ण प्रयोगांना प्रोत्साहन देणे. त्याच्या चांगल्या कामाची दखल घेणे.आणि चुका सुधारण्यासाठी सकारात्मक वातावरण निर्माण करणे. शिक्षकांना फुलांचा गुच्छ देण्यापेक्षा त्यांच्या हातात पुस्तक, प्रयोगाचे साधन आणि वर्गात प्रयोग करण्याचे स्वातंत्र्य दिले तर तो अधिक मोठा सन्मान ठरेल.

**पालक-समाज सहभाग:** शाळा ही केवळ शिक्षक आणि शासनाची जबाबदारी न राहता संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी झाली पाहिजे. शिक्षकाच्या मानसिक आणि व्यावसायिक सक्षमीकरणाला प्राधान्य प्रेरित शिक्षकच प्रेरणादायी वर्ग खोली निर्माण करू शकतो.

आपण स्वतःला एक मूलभूत प्रश्न विचारला पाहिजे आपण विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी तयार करतो आहोत की जीवनासाठी? जर उत्तर 'जीवनासाठी'असेल, तर आपल्या शिक्षण पद्धतीतही त्यानुसार बदल करावा लागेल.विद्यार्थ्याला केवळ नोकरी मिळविण्यास सक्षम करणे पुरेसे नाही.त्याला विचार करणारा, प्रश्न विचारणारा, निर्णय घेणारा, संवेदनशील, जबाबदार, सर्जनशील आणि लोकशाही मूल्यांवर विश्वास ठेवणारा नागरिक बनविणे हे शिक्षणाचे अंतिम ध्येय असले पाहिजे.

शिक्षक दिन हा शिक्षकांच्या गौरवाचा दिवस आहेच; पण त्यापेक्षा तो शिक्षण व्यवस्थेच्या आत्म परीक्षणाचा दिवस असायला हवा.आज महाराष्ट्राने स्वतःला विचारले पाहिजे.आपल्या शाळा बदलत आहेत का?आपले शिक्षक बदलत आहेत का?आपले अध्यापन बदलत आहे का?आणि सर्वांत महत्त्वाचे आपल्या विद्यार्थ्यांच्या शिकण्यात खरोखर बदल होत आहे का?कारण शाळेची खरी गुणवत्ता इमारतीच्या रंगात नसते.ती स्मार्ट बोर्ड मध्ये नसते.ती निकालाच्या टक्केवारीतही पूर्णपणे नसते.

शाळेची खरी गुणवत्ता विद्यार्थ्याच्या विचारात, प्रश्नात, कृतीत आणि व्यक्तिमत्त्वात दिसते. शिक्षक हा शिक्षण व्यवस्थेचा केवळ एक घटक नाही; तो या संपूर्ण व्यवस्थेचा आत्मा आहे.म्हणून शिक्षकांचा सन्मान केवळ ५ सप्टेंबरला नको. त्यांना वर्गात, व्यवस्थेत, समाजात आणि निर्णय प्रक्रियेतही सन्मान मिळावा.कारण शिक्षक घडला तर विद्यार्थी घडतो;विद्यार्थी घडला तर समाज घडतो;आणि समाज घडला तर राष्ट्रघडते.म्हणूनच महाराष्ट्राच्या शैक्षणिक भवितव्याचा विचार करताना शिक्षकांना केंद्रस्थानी ठेवणे ही केवळ गरज नाही,तर महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्याची अनिवार्य पूर्वअट आहे.शिक्षक दिनाच्या निमित्ताने शिक्षकांचा जयघोष करण्यापेक्षा,त्यांना उत्तम शिक्षण देण्यासाठी सक्षम करणाऱ्या व्यवस्थेचा संकल्प करूया.हीच शिक्षकांना खरी सन्मानांजली!

**-चंद्रकांत मेकाले,**
मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद नांदेड.

# मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन व विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त ७ ते २३ सप्टेंबरदरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त दि. ७ सप्टेंबर ते २३ सप्टेंबर २०२६ या दरम्यान 'मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन व विद्यापीठ वर्धापन दिन सप्ताह' साजरा करण्यात येणार आहे. या सप्ताहात लातूर, परभणी, हिंगोली व नांदेड जिल्ह्यांतील निवडक महाविद्यालयांमध्ये जिल्हास्तरीय स्पर्धा, तर विद्यापीठ मुख्य परिसरात विद्यापीठस्तरीय स्पर्धा, परिसंवाद, क्रीडा स्पर्धा, वृक्षारोपण, नाट्य सादरीकरण व विविध पुरस्कार वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

दि. ७ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हास्तरीय विविध स्पर्धांना सुरुवात होणार आहे. सकाळच्या सत्रात 'विद्यार्थ्यांना अपेक्षित शिक्षणव्यवस्था' या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात येणार आहे. लातूर जिल्ह्यात जयक्रांती महाविद्यालय, लातूर, परभणी जिल्ह्यात ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी, हिंगोली जिल्ह्यात आदर्श महाविद्यालय, हिंगोली, तर नांदेड जिल्ह्यात केआरएम महिला महाविद्यालय, नांदेड येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे.

याच दिवशी दुपारच्या सत्रात 'मराठवाडा मुक्तिसंग्राम' या विषयावर जिल्हास्तरीय रंगोळी स्पर्धा तसेच 'मराठवाडा मुक्तिसंग्राम' आणि 'विद्यापीठाचा वैभवशाली इतिहास' या विषयांवर जिल्हास्तरीय भिंतीपत्रक स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी लातूर जिल्ह्यात दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर, परभणी जिल्ह्यात संत तुकाराम महाविद्यालय, परभणी, हिंगोली जिल्ह्यात शिवाजी महाविद्यालय, हिंगोली, तर नांदेड जिल्ह्यात प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड यांच्याकडे आयोजनाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

दि.८ सप्टेंबर, २०२६ रोजी 'विद्यार्थ्यांना अपेक्षित शिक्षणव्यवस्था' या विषयावर जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा होणार आहे. ही स्पर्धा लातूर जिल्ह्यात दयानंद कला महाविद्यालय, लातूर, परभणी जिल्ह्यात शिवाजी महाविद्यालय, परभणी, हिंगोली जिल्ह्यात आदर्श महाविद्यालय, हिंगोली, तर नांदेड जिल्ह्यात नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड येथे आयोजित करण्यात येणार आहे.

दि.९ सप्टेंबर, २०२६ रोजी जिल्हास्तरीय देशभक्तीपर एकलगीत गायन स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी लातूर जिल्ह्यात सरस्वती संगीत महाविद्यालय, लातूर, परभणी जिल्ह्यात कमलताई जामकर महाविद्यालय परभणी, हिंगोली जिल्ह्यात कै. बाबुराव पाटील



महाविद्यालय, हिंगोली, तर नांदेड जिल्ह्यात यशवंत महाविद्यालय नांदेड येथे आयोजन करण्यात येणार आहे.

याच दिवशी 'मराठवाड्यातील उच्च शिक्षण : वास्तव व दिशा' या विषयावर जिल्हास्तरीय व्याख्यानांचे आयोजन करण्यात येणार आहे. लातूर जिल्ह्यात महात्मा बसवेश्वर महाविद्यालय लातूर, परभणी जिल्ह्यात शारदा महाविद्यालय, परभणी, हिंगोली जिल्ह्यात बहिर्जी स्मारक महाविद्यालय, बसमतनगर, जि. हिंगोली, तर नांदेड जिल्ह्यात सायन्स कॉलेज, नांदेड येथे व्याख्याने आयोजित करण्यात येणार आहेत.

दि. ११ सप्टेंबर २०२६ रोजी विद्यापीठस्तरीय स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. 'विद्यार्थ्यांना अपेक्षित शिक्षणव्यवस्था' या विषयावर विद्यापीठस्तरीय निबंध स्पर्धा आणि वक्तृत्व स्पर्धा भाषा, वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुल, विद्यापीठ मुख्य परिसर येथे होणार आहे.

याच दिवशी विद्यापीठस्तरीय देशभक्तीपर एकलगीत गायन स्पर्धा आयोजित करण्यात येणार असून, या कार्यक्रमाची जबाबदारी ललित व प्रयोगजीवी कला संकुलाकडे देण्यात आली आहे.

दि. १२ सप्टेंबर, २०२६ रोजी विद्यापीठस्तरीय भित्तीपत्रक अर्थात 'वॉल पेपर मॅगझिन' स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. या स्पर्धेचे विषय १) मराठवाडा मुक्तिसंग्राम आणि २) विद्यापीठाचा वैभवशाली इतिहास असे असणार आहेत. हा उपक्रम ज्ञान स्रोत केंद्र, विद्यापीठ मुख्यालय, नांदेड येथे आयोजित करण्यात येणार आहे. याच दिवशी विद्यापीठस्तरीय रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात येणार असून त्याचा विषय 'मराठवाडा मुक्तिसंग्राम' असा असणार आहे. तसेच विद्यापीठ स्तरीय ग्रंथ प्रदर्शन या उपक्रमाचे आयोजनही ज्ञानस्रोत केंद्र, विद्यापीठ मुख्यालय, नांदेड येथे करण्यात येणार आहे.

दि. १५ सप्टेंबर २०२६ रोजी महाविद्यालय स्तरावर प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात येणार आहे. या स्पर्धेतील किमान ५० टक्के प्रश्न मराठवाड्याशी संबंधित असावेत, असे नियोजन करण्यात आले आहे. विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालयांनी ही स्पर्धा आयोजित करावी, अशा सूचना देण्यात आल्या असून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना महाविद्यालय स्तरावर प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

दि. १६ सप्टेंबर, २०२६ रोजी 'विद्यार्थ्यांना अपेक्षित शिक्षणव्यवस्था' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम पीपल्स कॉलेज, नांदेड येथे होणार आहे. याच दिवशी क्रीडा विभागामार्फत विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी खेळांच्या स्पर्धांचेही आयोजन करण्यात येणार आहे. दि.१७ सप्टेंबर, २०२६ रोजी ध्वजारोहण समारंभानंतर वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. शक्यतो फळझाडांची लागवड करण्याचे नियोजन आहे. विद्यापीठाच्या ३२ व्या वर्धापन दिनानिमित्त ३२ झाडे आणि हैदराबाद मुक्तिसंग्राम दिनाच्या ७९ व्या वर्धापन दिनानिमित्त ७९ झाडे, असे एकूण १११ किंवा त्यापेक्षा अधिक झाडे विद्यापीठ परिसरात लावण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

हा वृक्षारोपण कार्यक्रम विद्यापीठ मुख्य परिसरासह उपपरिसर, लातूर, उपपरिसर, परभणी, न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली तसेच कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट येथेही राबविण्यात येणार आहे.

## भोकर विधानसभा मतदारसंघाची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध; ५,५६८ मतदारांची सुनावणी होणार

**भोकर (प्रतिनिधी)–** भारत निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत भोकर विधानसभा मतदारसंघाची प्रारूप मतदार यादी ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. भोकर तालुक्यातील १३६ मतदान केंद्रे तसेच मौजे वाकद येथे नव्याने तयार करण्यात आलेले एक मतदान केंद्र, अशा एकूण १३७ मतदान केंद्रांवर प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीस भोकर तालुक्यात १ लाख १४ हजार ८५६ मतदार होते. BLO यांच्या माध्यमातून मतदारांची घरभेट पडताळणी केल्यानंतर १३ हजार ३४५ SDD मतदार मृत, स्थलांतरित अथवा संबंधित पत्त्यावर उपलब्ध नसल्याचे आढळून आल्याने त्यांची वगळणी करण्यात आली आहे. त्यानंतर ३१ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारूप मतदार यादीत १ लाख १ हजार ५११ मतदारांचा समावेश आहे.

दरम्यान, प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीमध्ये एखाद्या नागरिकाचे नाव समाविष्ट करावयाचे असल्यास अथवा नाव, नोंद किंवा इतर तपशिलाबाबत काही आक्षेप असल्यास ३१ ऑगस्ट २०२६ ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावा किंवा आक्षेप दाखल करता येणार आहे.

भोकर तालुक्यातील मॅपिंग न झालेले ३,०६८ मतदार, तसेच मतदार यादीतील नावात व अन्य काही कारणांमुळे विसंगती (ॲनॉमलीज) निर्माण झालेल्या ५,५६८ मतदारांना नोटीस देऊन सुनावणी घेण्यात येणार आहे. संबंधित नोटीस मतदार केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत देण्यात येणार असून, नोटीस प्राप्त झालेल्या मतदारांनी त्यामध्ये नमूद केलेल्या तारखेस आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

सुनावणीच्या वेळी संबंधित मतदारांनी जन्म दाखला, पासपोर्ट, इयत्ता दहावीचे शैक्षणिक प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, केंद्र व राज्य शासन/सार्वजनिक क्षेत्रातील झडण अथवा निवृत्तीवेतनधारक ओळखपत्र किंवा आदेश, राज्य अथवा स्थानिक प्राधिकरणाची नोंदवही, शासनाने दिलेले जमीन/घर वाटप प्रमाणपत्र, वनहक्क प्रमाणपत्र, राष्ट्रीय नागरिक नोंदणीचा पुरावा तसेच शासन/स्थानिक प्राधिकरण/बँक/टपाल/एलआयसी/सार्वजनिक क्षेत्रातील झडण मार्फत दिनांक १ जुलै १९८७ पूर्वी निर्गमित केलेले ओळखपत्र किंवा प्रमाणपत्र यापैकी आवश्यक पुरावे सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

## महिलांनी व्यायाम आणि आहाराचे अचूक नियोजन केल्यास कुटुंबाचे आरोग्य सुधारेल

### राष्ट्रीय क्रीडादिनी मोनिका नांदेडकर यांचे प्रतिपादन

**नांदेड (प्रतिनिधी)–** महिलांनी व्यायाम आणि आहाराचे अचूक नियोजन केल्यास कुटुंबाचे आरोग्य सुधारेल, असे प्रतिपादन मोनिका नांदेड यांनी केले.



येथील कामेश्वरी हायट्स, कॅनाल रोड छत्रपती चौक येथे राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून मोनिका लेडीज फिटनेस क्लबच्या दुसऱ्या शाखेच्या उद्घाटन सोहळ्यात अध्यक्षीय भूमिका मांडताना मोनिका लेडीज फिटनेस क्लबच्या संचालिका मोनिका नांदेडकर यांनी मांडली आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महामानवांच्या प्रतिमेला अभिवादन करून मोनिका लेडीज फिटनेस क्लबच्या दुसऱ्या शाखेचे फित कापून उद्घाटन करण्यात आले. सदरील कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून क्रांतिज्योती सावित्रीआई ज्योतिराव फुले यांचे वारसदार फ्रीडम डॉ. महेश कळंबकर यांची प्रमुख उपस्थिती होती, तर प्रमुख पाहुणे म्हणून मराठवाडा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. सदाशिव रा. भुयारे यांची उपस्थिती होती.

मोनिका लेडीज फिटनेस क्लबच्या संचालिका मोनिका नांदेडकर पुढे बोलताना म्हणाल्या, आधुनिक मुली आणि महिलांनी केवळ चूल आणि मूल इथपर्यंत न थांबता, घर, शिक्षण, व्यायाम आणि आहार यांचे अचूक नियोजन करणे काळाची गरज आहे. कारण अलीकडे भेसळयुक्त फास्ट फूडमुळे मुले आणि महिलांचे आरोग्य धोक्यात येत असून प्रत्येक कुटुंबातील आहाराचे अचूक नियोजन केवळ महिलाच करू शकतात. त्यामुळे महिलांनी आहाराबरोबर किमान एक तास आपल्या व्यायामाला दिला पाहिजे. घरातील जबाबदार महिला दररोज व्यायाम करते हे लक्षात आल्यास घरातील इतर सदस्यांना व मुलांना व्यायामाची आवड आणि गोडी निर्माण होते. पर्यायाने संपूर्ण कुटुंबाचे आरोग्य सुधारते, असे प्रतिपादन मोनिका लेडीज फिटनेस क्लबच्या संचालिका मोनिका नांदेडकर यांनी केले.

कार्यक्रमात गुणाजी पाईकराव, बायसुबाई पाईकराव, मुरलीधर खंडागळे, प्रजाताई डोंगरे, संघानंद पाईकराव, अनिल पाईकराव, प्रियंका पाईकराव, अमोल कांबळे, सोनुताई कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनिल पाईकराव, राजेश सरोदे, संदीप जाधव, माधव भुयारे, शाश्वत भुयारे आदींनी परिश्रम घेतले.

## लॉयन्स क्लब नांदेड आयोजित रोहित मेहता लॉयन्स क्रेस्ट सेवा सप्ताहाची सांगता

### विविध भरगच्च उपक्रमांचे यशस्वी आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** लॉयन्स क्लब इंटरनॅशनल द्वारा निर्देशित रोहित मेहता लॉयन्स क्रेस्ट सेवा सप्ताह लॉयन्स क्लब नांदेड द्वारा विविध शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक तथा आरोग्यविषयक उपक्रमांचे भरगच्च कार्यक्रम घेण्यात आले.

या सप्ताहामध्ये प्रामुख्याने १५ ऑगस्ट रोजी ऑक्सफर्ड द ग्लोबल इंग्लिश स्कूल पुयणी येथे लॉयन्सचे प्रांतपाल पीएमजेएफ लॉ राहुल औसेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. तद्नंतर शाळा परिसरामध्ये वृक्षारोपण तसेच राष्ट्रभक्तीपर गायन, नृत्य व इतर कार्यक्रम उत्साहात पार पडले. यावेळी शाळेतील २७ शिक्षकांना लॉयन्स क्रेस्ट अंतर्गत टीचर्स रिफ्रेशर कोर्सचे प्रशिक्षण पूर्वप्रांतपाल लॉ बी. एल. जोशी यांनी दिले. प्रांतपाल पीएमजेएफ लॉ राहुल औसेकर यांच्या हस्ते उद्घाटकीस कार्यक्रमात उपप्रांतपाल पीएमजेएफ लॉ योगेश जैस्वाल, पीएमसीसी लॉ दिलीप मोदीजी, जीएमटी कॉर्डिनेटर लॉ रवी कडगे, कॅबिनेट चेअरमन लॉ अशोक पांचाळ, रिजन कॉर्डिनेटर लॉ प्रा.विनायक चव्हाण, रिजन चेअरपरसन एमजेएफ लॉ सुरभी माहेश्वरी, झोन चेअरपर्सन लॉ डॉ ज्योती जांगिड, लॉ उमा शेट्टी आदींसह प्रमुख पदाधिकारी, सदस्य प्रामुख्याने उपस्थित होते. ही कार्यशाळा लिओ क्लब नांदेड सोबत संयुक्तरित्या घेण्यात आली. यामध्ये क्लब अध्यक्षा लिओ मेघना शेट्टी यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच त्यांचे सहकारी लिओ हर्ष माहेश्वरी, लिओ आदित्य लाहोटी यांनी विशेष परिश्रम घेतले.

आर्य हिंदी विद्या मंदिर नांदेड येथे दि. २० ऑगस्ट रोजी विद्यार्थ्यांना पुस्तके व शालेय साहित्य वितरण, पिस पोस्टर कॉम्पेटिशन आणि क्लीन स्कूल कम्युनिटी ड्राईव्ह या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सुमारे २०० विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके व शालेय साहित्य देण्यात आले. पिस पोस्टर कॉम्पेटिशनमध्ये ४ थी ते ७ वीच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवित आपल्या कलागुणांचे प्रदर्शन केले. तीन विभागामध्ये घेतलेल्या या स्पर्धेत प्रत्येक गटातून प्रथम, द्वितीय, तृतीय व तसेच २ उत्तेजनार्थ पारितोषिक आणि प्रमाणपत्र देण्यात आले. याप्रसंगी विशेषतः सर्व विद्यार्थ्यांना शालेय स्वच्छतेचे महत्व पटवून देण्यात आले ज्याचे फलस्वरूप सर्वांनी स्वच्छ शाळा ठेवण्याचा निर्धार केला आणि मोहिमेत सक्रीय सहभाग नोंदविला. हा कार्यक्रम पीएमजेएफ लॉ बलजितकौर रामगडिया यांच्या विशेष सहकार्याने पार पडला. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक राजुरे, शिक्षकवृंद, कर्मचारी, पालक आणि प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

दि. २६ ऑगस्ट रोजी सकाळी महानगर पालिका सफाई कर्मचाऱ्यांना रेन कोटचे वितरण करून त्यांना सन्मानित व प्रोत्साहित करण्यात करण्यात आले तसेच याप्रसंगी त्यांच्या अमूल्य योगदानाबद्दल आभार व्यक्त करण्यात आले.

याप्रसंगी मनपाच्या आरोग्य व स्वच्छता निरीक्षक श्रीमती एंगडे, सहायक साहेबराव यांच्यासह कर्मचारी व प्रतिष्ठित नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते. या सप्ताहाचा समारोप संध्याछाया संचलित केतीबेन रुस्तुम मेवावाला वृद्धाश्रमाला भेट देऊन अन्नदानाने झाला. या कार्यक्रमात वृद्धांशी संवाद साधून त्यांच्याशी आस्थेवाईक हितगुज केली.

## स्व. सरोजताई देशपांडे आत्मसन्मान पुरस्कार परभणीच्या निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती अनुराधा ढालकरी यांना जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्व. सरोजताई देशपांडे यांच्या नावाने देण्यात येणारा स्व. सरोजताई देशपांडे आत्मसन्मान पुरस्कार परभणी येथे कार्यरत अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती अनुराधा ढालकरी- पैंजने यांना जाहीर करण्यात आला असून, गुरुवार, दि. १७ सप्टेंबर रोजी नियोजन भवन येथे मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती मुख्य संयोजक तथा दै. समीक्षाचे मुख्य संपादक रुपेश पाडमुख यांनी दिली आहे.



स्व. सरोजताई देशपांडे आत्मसन्मान पुरस्कार देशभरात प्रशासन क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या महिला अधिकाऱ्याला प्रदान केला जातो. या पुरस्काराचे स्वरूप ५१ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह आणि मानपत्र असे आहे. सदरील पुरस्कार सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन मंथन क्रिएटिव्ह ग्रुप व लातूरचे संपादक रामेश्वर धुमाळ, प्रदेश प्रभारी अरविंद जाधव पाटील, सहसंयोजक बालाजी दुधंबे, उपाध्यक्ष प्रा. अमृत जाधव, उपसंपादक ज्ञानेश्वर पवार, सुनील कुलकर्णी, प्रदेशाध्यक्ष दत्ताजी मोहिते, मराठवाडा अध्यक्ष सखाराम कुलकर्णी, महानगराध्यक्ष रमेश देवडे, सौ. सुनिता चौहाण, सौ. सुनीता गबाळे, श्रीमती उषा हडोळतीकर, सौ. अरुणा पुरी, सौ. पद्मावती झंपलवाड, शिवहरी गाडे यांच्यासह मुख्य संयोजक तथा मुख्य संपादक रुपेश पाडमुख यांनी केले आहे.

## कुबरेश्वर महादेव मंदिर हडको येथे गोकुळाष्टमी निमित्ताने विविध कार्यक्रम

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** हडको येथील कुबरेश्वर महादेव मंदिर येथे श्रावण मासानिमित्ताने महिनाभर महाआरती व त्यानंतर भजनाचा कार्यक्रम दररोज व महाप्रसाद घेण्यात आला.



तसेच गोकुळाष्टमी निमित्ताने जन्मोत्सव, भजन संध्या, जय श्री कृष्ण इतर विविध कार्यक्रमाचे आयोजन सालासार भजनी मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

श्रावण माससनिमित्ताने गोकुळ अष्टमी निमित्ताने स्वरचंद प्रतिष्ठान पंडित लक्ष्मीकांत रवंदे प्रस्तुत शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर २०२६ रोजी धार्मिक कार्यक्रम घेण्यात आले तर सोहम संगीत संच कौठा नांदेड यांच्या तर्फे रंगराव शिंदे यांचा भजनाचा कार्यक्रम रविवार, दि. ६ सप्टेंबर २६, सोमवार, दि. ७ सप्टेंबर २६ रोजी सालासर भजनी मंडल नांदेड यांच्या भजनाचा कार्यक्रम होणार आयोजित करण्यात आला आहे.

सदरील कार्यक्रम जाज्वल्य हनुमान मंदिर आणि कुबरेश्वर महादेव मंदिर हडको नांदेड येथे आयोजित करण्यात आला आहे. श्री हनुमान सर्व भक्तगणांनी या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष बजरंग भेंडेकर व उपाध्यक्ष सतीश भेडेंकर, उमेश तुपेकर, संदीप मोती, पवार रामचंद्र, पल्लेवाड, बालाजी रहाटकर, विनायक जोशी व पदाधिकारी यांनी केले आहे.

## प्रतिभा निकेतन महाविद्यालयात रांगोळी व भित्तीपत्रक स्पर्धेचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने प्रतिभा निकेतन महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने 'मराठवाडा मुक्ती संग्राम व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा वर्धापन दिना' निमित्त नांदेड जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी जिल्हास्तरीय रांगोळी व भित्तीपत्रक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील स्पर्धा सोमवार, दि. ७ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १ ते ३ या वेळेत प्रतिभा निकेतन महाविद्यालय, वजीराबाद, नांदेड येथे आयोजित करण्यात आली आहे.

रांगोळी स्पर्धेचा विषय 'मराठवाडा मुक्ती संग्राम' असा असून, रांगोळीचा आकार २ बाय २ फूट राहणार आहे. तर भित्तीपत्रक स्पर्धेसाठी 'मराठवाडा मुक्ती संग्राम' तसेच 'विद्यापीठाचा वैभवशाली इतिहास' हे विषय देण्यात आले असून भित्तीपत्रकाचा आकार २ बाय ३ फूट राहणार आहे. या स्पर्धांमध्ये नांदेड जिल्ह्यातील अधिकाधिक महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## श्रावणमासानिमित्त किनवटमध्ये कावड यात्रा



**किनवट (प्रतिनिधी)–** श्रावणमासानिमित्त येथील श्री राम मंदिर प्रांगणातून बुधवार, दि. २ सप्टेंबर रोजी कावड यात्रा काढण्यात आली. यानिमित्त पूजेचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी परिसरातील अनेक महिलांनी पारंपरिक वेशभूषेत मोठ्या संख्येने सहभाग घेतला. उपस्थित महिलांनी सुंदर रंगीबेरंगी साड्या, गळ्यात भगवे उपरणे आणि पुष्पहार परिधान केले होते. राम नामाचा जयघोष आणि भक्तीमय वातावरणात हा कार्यक्रम पार पडला.

या धार्मिक सोहळ्यामुळे मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाच्या शेवटी महाप्रसाद व आरतीने सोहळ्याची सांगता उत्साहात झाली.

## श्री शिव महापुराण कथा महोत्सवाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** श्रावण मास निमित्ताने श्री दत्त मंदिर, श्री स्वामी समर्थ मंदिर, श्रीपाद नगर, जुना कौठा नांदेड येथे आयोजित हभप प्रवीण शास्त्री केळीकर यांच्या सुमधुर वाणीतून संगीतमय शिवपुराण कथा सोहळ्याला भाविक भक्तांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दैनंदिन यजमान यांच्या उपस्थितीत महाआरतीचे आयोजन करण्यात आले.

तसेच श्री शिवमहापुराण कथा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. ३० ऑगस्ट ते ५ सप्टेंबर दरम्यान दुपारी ३ ते ६ शिव महापुराण कथा सोहळा हभप प्रवीण शास्त्री केळीकर यांच्या सुमधुर वाणीतून व सोहम संगीत संच यांच्या साथ संगतीने साजरा होत आहे.

या सात दिवसाच्या कथा निरूपणमध्ये शिवपुराण कथा महात्म्य, देवरात चरित्र, चंचुला आख्यान, शिवपुराण श्रवणविधी, साध्य साधन विचार, अग्निस्तंभातून शिवप्राकट्य, शिवलिंग स्थापना विधी, पार्थिवलिंग पूजन विधी.

रुद्राक्ष धारण विधी, सृष्टीखंड कथानक, सतिखंड कथानक, शिवपार्वती विवाह सोहळा, कुमारखंड कथाभाग, युद्धखंड कथाभाग, नंदीश्वर अवतार वर्णन, पिप्पलाद अवतार वर्णन, एकादश रुद्र अवतार वर्णन, पवित्र द्वादश ज्योतिर्लिंग कथा, उमासंहिता कथानक, कैलाससंहिता कथा चिंतन व समारोप उपमन्यू कथा चिंतन, ग्रंथमहिमा आणि कथेची सांगता होणार आहे.

कथा सप्ताह अंतर्गत दैनंदिन विठ्ठलराव काळे, पंजाबराव काळे (अ.भा. छावा प्रदेशाध्यक्ष), जगन्नाथराव काळे, शंकरराव बोरलेपवार, रोहित शेठ शास्त्री, दत्तात्रयराव कुरुडे, दीपाली मोरे, योगेश तृप्तेवार, महेश भिंगेवार, चंद्रकांत काळे, सखाराम काकडे, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, गंगाप्रसाद काकडे, वैभव धोंडे, राजू काळे आदी महाआरती यजमान आहेत. या शिवपुराण कथा सोहळ्याचे आयोजन आयोजक कृष्णा बालाजीराव काळे यांनी केले असून, महाप्रसादाचे मानकरी सतीश ठुबे, विठ्ठलराव काळे, आदीजण आहेत.

## विद्यार्थिनी सुरक्षा, शैक्षणिक गुणवत्ता विकासासाठी जनजागृती अभियान संपन्न

### स्क्रीन टाइम, सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, चारित्र्य व जीवनमूल्यांची रुजवण

**नांदेड (प्रतिनिधी)–** मराठा सेवा संघाच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून संत गाडगेबाबा प्रबोधन कक्ष, वीर भगतसिंग विद्यार्थी परिषद (व्हिबीव्हिपी) आणि जमाते इस्लामी हिंद यांच्या संयुक्त विद्यमाने 'विद्यार्थिनी सुरक्षा व शैक्षणिक गुणवत्ता विकास अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत नांदेड शहरातील विविध शैक्षणिक संकुलांमध्ये विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे.

मराठा सेवा संघाच्या स्थापनेला ३५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने वर्षभर विविध शैक्षणिक, सामाजिक व विद्यार्थीहिताचे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. त्याचाच एक भाग म्हणून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासोबतच किशोरवयीन मुलींची सुरक्षितता, विद्यार्थ्यांमधील शिस्त, चारित्र्य आणि जीवनमूल्यांची जपणूक यावर विशेष भर देण्यात येत आहे.

न्या. भीमराव नरवाडे पाटील, इंजि. पुरुषोत्तम खेडेकर आणि ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्रा. व्ही. डी. कोनाळे यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच प्राचार्य संजय पाटील शेळगावकर, प्रा. दत्तात्रय बिरादार, दिलीप पारेकर आणि प्रा. योगेश




कन्हेरे यांच्या सहयोगाने हा विद्यार्थीहितैषी उपक्रम राबविण्यात येत आहे. व्हीबीव्हीपीचे राष्ट्रीय अध्यक्ष शिवाजीराजे पाटील, जमाते इस्लामी हिंदचे प्रा. अब्दुल कदीर, डॉ. नामदेव दळवी, इंजि. अबरार देशमुख, इंजि. आतिश दांडेगावकर, प्रा. अब्दुल जलील, तानाजी भोसले, इंजि. स्मितल साळुंखे आदी शिक्षणप्रेमी मान्यवरांचा अभियानात सहभाग राहणार आहे.

किशोरवयीन विद्यार्थ्यांमधील वाढता स्क्रीन टाइम, सोशल मीडियाचा अनिर्बंध वापर आणि त्यातून निर्माण होणाऱ्या विविध समस्या यामुळे शिक्षक व पालकांसमोर नवी आव्हाने उभी राहत आहेत. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचा विवेकी वापर, सुरक्षित वर्तन, शिस्तबद्ध जीवनशैली आणि सकारात्मक विचारांची दिशा देण्याचा प्रयत्न या अभियानातून केला जात आहे.

विद्यार्थ्यांच्या मन, मनगट, मस्तक, मेंदू आणि मानसिकता सशक्त करण्याच्या उद्देशाने नांदेड शहरातील सर्व हायस्कूल्स, ज्युनिअर कॉलेजेस, निवासी वसतिगृहे तसेच कोचिंग क्लासेसमध्ये हे अभियान टप्प्याटप्प्याने राबविण्यात येणार आहे.

याबाबत युवामानसशास्त्राचे अभ्यासक तथा स्टुडंट–पॅरेंट काऊन्सिलर शिवाजीराजे पाटील यांनी माहिती देताना सांगितले की, विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिकदृष्ट्या सक्षम करणे पुरेसे नसून त्यांची विचारशक्ती, मानसिकता, व्यक्तिमत्त्व, चारित्र्य आणि सामाजिक जाणीवही सक्षम होणे आवश्यक आहे. याच उद्देशाने विद्यार्थी व पालकांमध्ये सकारात्मक संवाद निर्माण करण्यासाठी हे अभियान व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार आहे.

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

## हेडफोनची गरज संपणार!

### स्पीकरचा आवाज थेट तुमच्याच कानांपर्यंत; शेजाऱ्यांना लागणार नाही चाहूल...

**लवकरच इअरफोन किंवा हेडफोन भूतकाळातील गोष्ट ठरण्याची शक्यता आहे. कारण अशी अत्याधुनिक तंत्रज्ञान प्रणाली विकसित करण्यात आली आहे, ज्याच्या मदतीने स्पीकरमधून निघणारा आवाज थेट एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या कानांपर्यंत पोहोचवता येणार आहे. त्यामुळे आजूबाजूच्या व्यक्तींना आपण काय ऐकत आहोत, याची चाहूलही लागणार नाही. विशेष म्हणजे, यासाठी कानांवर स्वतंत्र उपकरण लावण्याचीही आवश्यकता भासणार नाही.**



कल्पना करा, मेट्रो किंवा विमानातून प्रवास करताना हेडफोन न लावता तुम्हाला तुमचा आवडता चित्रपट पाहता येत आहे आणि शेजारी बसलेल्या व्यक्तीलाही त्याची कोणतीही कल्पना नाही. हे एखाद्या विज्ञानकथेसारखे वाटत असले, तरी आता ते प्रत्यक्षात येण्याच्या मार्गावर आहे. सामान्य स्पीकरमधून निघणारा आवाज साधारणपणे चारही दिशांना पसरतो. त्यामुळे आजूबाजूच्या सर्वांनाच तो ऐकू येतो. हीच समस्या दूर करण्यासाठी पोहांग युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी (POSTECH) येथील वैज्ञानिकांनी MiPAL नावाचा अनोखा दिशानिर्देशक स्पीकर विकसित केला आहे. या स्पीकरची विशेषता म्हणजे तो आवाज प्रकाशकिरणाप्रमाणे थेट एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या कानांकडे पाठवू शकतो. त्यामुळे हेडफोन किंवा इअरफोन न वापरताही, आजूबाजूच्या व्यक्तींना त्रास न देता आवडते संगीत ऐकणे किंवा चित्रपट पाहणे शक्य होऊ शकते.

### थेट कानांपर्यंत पोहोचणार आवाज

प्रकाश आणि ध्वनीमध्ये मोठा फरक आहे. प्रकाश सरळ रेषेत प्रवास करतो, तर ध्वनी चारही दिशांना पसरतो. आतापर्यंत सामान्य स्पीकरच्या आवाजाला एका विशिष्ट दिशेने केंद्रित करण्यासाठी शेकडो महागडे ध्वनिरूपांतरक म्हणजेच ट्रान्सड्यूसर वापरावे लागत होते. दुसरीकडे, कमी किमतीच्या सिंगल-एलिमेंट स्पीकरमध्ये बाजूच्या दिशेने आवाज गळण्याची समस्या होती. POSTECHचे प्राध्यापक जुनसुक रो आणि त्यांच्या चमूने ही अडचण दूर करण्यासाठी अल्ट्रासोनिक तरंगांचा वापर श्राव्य ध्वनीसोबत केला आहे. त्यामुळे ध्वनीला एका सरळ किरणामध्ये केंद्रित करणे शक्य झाले आहे.

### आजूबाजूच्या व्यक्तींना ऐकू येणार नाही आवाज

या उपकरणात संशोधकांनी ड्युअल-मेटामटेरियल तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. स्पीकरच्या पुढील भागात असलेली ही रचना भिंगाप्रमाणे कार्य करते आणि अल्ट्रासोनिक तरंगांना एका विशिष्ट किरणामध्ये केंद्रित करते. याशिवाय, स्पीकरमधून निर्माण होणारी अनावश्यक कंपनेही ही रचना कमी करते. परिणामी, आवाज बाजूच्या दिशेने पसरण्याचे प्रमाण कमी होते. या सिंगल-एलिमेंट उपकरणाची वारंवारता श्रेणी ५०० हर्टझ ते १० किलोहर्टझ इतकी आहे. विमानातील आसनव्यवस्थेसारखे वातावरण तयार करून त्याची चाचणी घेण्यात आली. या चाचणीत प्रत्यक्ष संगीत आणि प्रसारणाचे संकेत वापरण्यात आले. चाचणीच्या निष्कर्षातून असे दिसून आले की, शेजारी बसलेल्या व्यक्तीला त्रास न देता केवळ एका व्यक्तीपर्यंत ध्वनी केंद्रित पद्धतीने पोहोचवणे शक्य आहे.

### त्रिमितीय मुद्रणातून सहज निर्मिती

या उपकरणाची आणखी एक महत्त्वाची वैशिष्ट्ये म्हणजे ते त्रिमितीय मुद्रण (3D Printing) तंत्रज्ञानाच्या मदतीने तयार करता येते. त्यामुळे वेगवेगळ्या आसनांमधील अंतर, ध्वनीकिरणाचा कोन आणि वापराच्या गरजा लक्षात घेऊन या उपकरणाची रचना जलद आणि तुलनेने कमी खर्चात बदलता येऊ शकते. संशोधकांच्या मते, भविष्यात या तंत्रज्ञानाचा वापर रेल्वे, विमाने आणि मोटारींमध्ये वैयक्तिक ध्वनीव्यवस्थेसाठी केला जाऊ शकतो. तसेच संग्रहालयांसारख्या ठिकाणीही याचा उपयोग होऊ शकतो. अशा ठिकाणी हेडफोन न वापरता, आजूबाजूच्या लोकांना कोणताही त्रास न देता एखाद्या व्यक्तीला थेट त्याच्या कानांपर्यंत माहिती किंवा विशेष निवेदन ऐकवता येईल. म्हणजेच, भविष्यात 'माझा आवाज फक्त मलाच ऐकू यावा' ही कल्पना हेडफोनशिवाय प्रत्यक्षात उतरू शकते.

## SIRच्या प्रारूप मतदार यादीत तुमचे नाव आहे की वगळले?




### मोबाईलवर तीन पद्धतींनी करा तपासणी; जाणून घ्या प्रक्रिया

**दिल्ली आणि महाराष्ट्रातील विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) अंतर्गत प्रारूप मतदार यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीत तुमचे नाव आहे की वगळण्यात आले आहे, हे आता मोबाईलच्या माध्यमातून अवघ्या काही मिनिटांत तपासता येणार आहे. यासाठी मतदार ओळखपत्र, मोबाईल क्रमांक किंवा नाव आणि वैयक्तिक माहितीचा वापर करता येईल.**

» SIRच्या प्रारूप मतदार यादीत नाव कसे तपासाल? : विशेष सखोल पुनरिक्षण (Special Intensive Revision - SIR) अंतर्गत दिल्ली आणि महाराष्ट्राची नवीन प्रारूप मतदार यादी जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे मतदार यादीत आपले नाव कायम आहे की वगळण्यात आले आहे, हे तपासणे आता सोपे झाले आहे. मोबाईलवरून SIRच्या यादीत नाव तपासण्यासाठी तीन पद्धती उपलब्ध आहेत. दिल्ली किंवा महाराष्ट्रातील मतदारांना काही मिनिटांत आपले नाव आणि मतदार यादीतील स्थिती तपासता येईल.

» EPIC क्रमांकाच्या माध्यमातून नाव तपासा : तुमच्याकडे मतदार ओळखपत्र असल्यास, निवडणूक आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन SIRच्या प्रारूप मतदार यादीत आपले नाव तपासता येईल. प्रथम voters.eci.gov.in या संकेतस्थळावर जा. त्यानंतर मुख्य पृष्ठावरील 'Search in Electoral Roll' हा पर्याय निवडा. आपली भाषा निवडा. त्यानंतर १० अंकी EPIC क्रमांक नोंदवा आणि राज्य म्हणून दिल्ली किंवा महाराष्ट्र निवडा. त्यानंतर दिलेला कॅप्चा भरा आणि 'Search'वर क्लिक करा. तुमचे नाव प्रारूप मतदार यादीत असल्यास, तुमचे मतदान केंद्र, विधानसभा मतदारसंघ आणि भाग क्रमांक यांची माहिती स्क्रीनवर दिसेल.

» मोबाईल क्रमांक आणि ओटीपीच्या माध्यमातून तपासा : मतदार ओळखपत्र जवळ नसले तरी निवडणूक आयोगाच्या नोंदीतील मोबाईल क्रमांकाच्या माध्यमातून नाव आणि स्थिती तपासता येते. निवडणूक आयोगाच्या अधिकृत



संकेतस्थळावर जाऊन 'Search by Mobile' हा पर्याय निवडा. त्यानंतर राज्य आणि भाषा निवडा. निवडणूक आयोगाच्या नोंदीत नोंद असलेला तुमचा १० अंकी मोबाईल क्रमांक टाका. **'Send OTP'**वर क्लिक करा. मोबाईलवर प्राप्त झालेला ओटीपी आणि स्क्रीनवर दिसणारा कॅप्चा क्रमांक भरा. त्यानंतर त्या मोबाईल क्रमांकाशी संबंधित नोंदणीकृत मतदारांची माहिती स्क्रीनवर दिसेल.

» नाव आणि वैयक्तिक माहितीच्या आधारे तपासा : तुमचे नाव आणि वैयक्तिक माहिती वापरूनही SIRच्या प्रारूप मतदार यादीतील स्थिती तपासता येते. निवडणूक आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावरील 'Search by Details' हा पर्याय निवडा. त्यामध्ये तुमचे नाव, आडनाव, वडिलांचे किंवा पतीचे नाव, जन्मतारीख किंवा वय आणि लिंग यांची माहिती भरा. त्यानंतर आपले राज्य, जिल्हा आणि संबंधित विधानसभा मतदारसंघ निवडा. कॅप्चा भरून 'Search'वर क्लिक करा. त्यानंतर तुमच्या परिसरातील समान किंवा जवळच्या नावांची यादी दिसेल. त्यामधून पत्ता आणि इतर माहितीच्या आधारे आपले योग्य नाव तपासता येईल. मतदान केंद्राची संपूर्ण पीडीएफ यादीही डाउनलोड करता येईल.

» पीडीएफ स्वरूपातही डाउनलोड करा... : voters.eci.gov.in या संकेतस्थळावर जा. 'Download Electoral Roll' हा विभाग निवडा. आपले राज्य, जिल्हा, विधानसभा मतदारसंघ आणि जवळचे मतदान केंद्र निवडा. त्यानंतर कॅप्चा भरा आणि मतदान केंद्राची संपूर्ण प्रारूप मतदार यादी पीडीएफ स्वरूपात डाउनलोड करा. या यादीत अनुक्रमानुसार घर क्रमांक आणि मतदारांची नावे नोंदविलेली असतात.


### प्रारूप यादीत नाव नसेल तर काय करावे?

प्रारूप मतदार यादी ही अंतिम यादी नसते. त्यामुळे प्रारूप यादीत नाव आढळले नाही, तरी मतदारांनी घाबरून जाण्याचे कारण नाही. आपले नाव यादीत समाविष्ट करण्यासाठी दावे आणि हरकती नोंदविण्याची संधी उपलब्ध असते. नाव मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठी निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर किंवा मतदार हेल्पलाइन ॲपच्या माध्यमातून नमुना क्रमांक ६ (Form 6) ऑनलाइन भरता येतो. नाव, पत्ता किंवा छायाचित्रामध्ये काही चुकीची माहिती असल्यास ती दुरुस्त करण्यासाठी नमुना क्रमांक ८ (Form 8) सादर करता येतो. त्यामुळे प्रारूप यादीत नाव नसल्यास किंवा माहितीमध्ये त्रुटी आढळल्यास, निर्धारित कालावधीत दावा किंवा हरकत नोंदवून आवश्यक दुरुस्ती करून घेणे महत्त्वाचे आहे. त्यानंतर अंतिम मतदार यादीत योग्य माहिती समाविष्ट होण्याची शक्यता असते.

## रेल्वे अपघातांना 'पूर्णविराम' देणार 'कवच 4.0'

### स्वदेशी तंत्रज्ञान कसे करते काम? धुक्यातही होणार नाही सिग्नलची चूक!

**भारतीय रेल्वे आपल्या संकेतव्यवस्थेला 'कवच ४.०' या अत्याधुनिक तंत्रज्ञानाने वेगाने सज्ज करत आहे. रेल्वेगाड्यांना अपघातांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी विकसित करण्यात आलेली ही स्वदेशी स्वयंचलित रेल्वे संरक्षण प्रणाली आहे. दाट धुके, लाल सिग्नलकडे दुर्लक्ष होणे किंवा रेल्वेमार्गावर एखादा अडथळा निर्माण होणे अशा परिस्थितीत 'कवच ४.०' प्रणाली स्वयंचलितपणे ब्रेक कार्यान्वित करून रेल्वेगाडी सुरक्षितपणे थांबवू शकते.**



» 'कवच ४.०' नेमके कसे काम करते? : 'कवच' ही भारतात विकसित करण्यात आलेली स्वयंचलित रेल्वे संरक्षण प्रणाली आहे. ती RFID, प्रकाशीय तंतू केबल आणि बिनतारी रेडिओ संदेशवहनाच्या माध्यमातून कार्य करते. ही प्रणाली तात्काळ लोकोमोटिव्हच्या ब्रेक प्रणालीला आदेश पाठवून रेल्वेगाडीचा वेग नियंत्रित करते. गरज भासल्यास ती आपत्कालीन ब्रेकही स्वयंचलितपणे लागू करते आणि गाडी पूर्णपणे थांबवते. त्यामुळे दोन रेल्वेगाड्यांची समोरासमोर होणारी धडक टाळण्यास मोठी मदत होते.

» 'कवच ४.०'ची यंत्रणा नेमकी कशी असते? : 'कवच ४.०' ही केवळ रेल्वे इंजिनमध्ये बसविण्यात येणारी एखादी स्वतंत्र यंत्रणा नाही. त्याऐवजी ती रेल्वेमार्गाच्या कडेला असलेल्या यंत्रणा आणि रेल्वेगाडी यांच्यामध्ये संदेशवहनाचे जाळे तयार करते. यासाठी रेल्वेने आतापर्यंत ११,५४७ किलोमीटर लांबीची प्रकाशीय तंतू केबल टाकली आहे. तसेच या प्रणालीला सहाय्य करण्यासाठी १,७२१ दूरसंचार मनोरे उभारण्यात आले आहेत. याशिवाय १,००९ रेल्वे स्थानकांवर स्थानक माहिती केंद्रे उभारण्यात आली आहेत. या केंद्रांचे काम रेल्वेगाडीचे स्थान, वेग आणि समोरील सिग्नलची स्थिती यावर अत्यंत अल्प अंतराने सतत लक्ष ठेवणे हे आहे.

» इंजिनमध्ये बसविले जात आहेत 'ऑन-बोर्ड संगणक' : मिळालेल्या माहितीनुसार, रेल्वेने आतापर्यंत ६,२९० इंजिनमध्ये 'कवच' प्रणाली बसविली आहे. आणखी ७,१९० इंजिन तसेच १,२०० ईएमयू/मेमू स्थानिक रेल्वेगाड्यांमध्ये ही प्रणाली बसविण्याचे काम सुरू आहे. इंजिनमध्ये बसविण्यात आलेला 'ऑन-बोर्ड संगणक' रेल्वेमार्गावर बसविण्यात आलेले RFID टॅग ओळखतो. एखाद्या मार्गावर दोन रेल्वेगाड्या एकमेकींच्या दिशेने वेगाने येत असतील किंवा एखादी गाडी निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक वेगाने धावत असेल, तर ही प्रणाली ध्वनी व दृश्य स्वरूपातील इशारा देते आणि आवश्यकतेनुसार स्वयंचलितपणे ब्रेक लागू करते.

» देशभरात मोठ्या प्रमाणावर होणार विस्तार : 'कवच ४.०' प्रणाली आतापर्यंत २,६३३ मार्गकिलोमीटरवर कार्यान्वित झाली आहे. लवकरच तिचा देशभरात मोठ्या प्रमाणावर विस्तार करण्याची तयारी सुरू आहे. या तंत्रज्ञानामुळे भारतीय रेल्वेची संपूर्ण संकेतव्यवस्था अधिक सुरक्षित आणि आधुनिक होण्यास मदत होणार आहे. विशेषतः धुके, सिग्नलचे उल्लंघन, अतिवेग किंवा रेल्वेमार्गावरील संभाव्य अडथळे अशा परिस्थितीत 'कवच ४.०' प्रणाली मानवी चुकांमुळे होणारे अपघात टाळण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावू शकते. स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित 'कवच ४.०'चा विस्तार जसजसा वाढेल, तसतशी भारतीय रेल्वेची सुरक्षितता अधिक बळकट होण्याची अपेक्षा आहे.

## GPay, PhonePe आणि Paytmच्या व्यवहारात मोठा बदल

### आता ग्राहकाऐवजी AI एजंट करणार UPI पेमेंट, जाणून घ्या नवे तंत्रज्ञान

UPI व्यवहाराच्या पद्धतीत लवकरच मोठा बदल होण्याची शक्यता आहे. UPI पेमेंटमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात AI एजंट्सचा प्रवेश होऊ शकतो. विशेष म्हणजे, प्रत्येक छोट्या डिजिटल व्यवहारासाठी ग्राहकाची स्वतंत्र मंजुरी घेण्याची आवश्यकता भासणार नाही. भारतात राष्ट्रीय डिजिटल पेमेंट पायाभूत सुविधेच्या माध्यमातून 'एजंटिक पेमेंट्स' सुरू करण्यासाठी एक नवीन प्रणाली विकसित केली जात असल्याची माहिती आहे. या बदलामुळे GPay, PhonePe आणि Paytm यांसारख्या UPI ॲप्सचा वापर करण्याची पद्धतही बदलू शकते. प्रस्तावित प्रणाली UPIवर आधारित असेल.

### सोप्या भाषेत समजून घ्या काय होणार...

» सध्या UPIद्वारे पैसे पाठवताना ग्राहकाला स्वतः व्यवहार करावा लागतो आणि प्रत्येक व्यवहाराची प्रक्रिया त्यालाच पूर्ण करावी लागते. मात्र, AI एजंट प्रणाली लागू झाल्यास ग्राहक आपल्या AI एजंटला काही विशिष्ट सूचना देऊ शकेल. उदाहरणार्थ, कोणत्या वस्तूंसाठी, किती रकमेपर्यंत आणि कोणत्या परिस्थितीत पैसे खर्च करण्याची परवानगी आहे, हे ग्राहक आधीच निश्चित करू शकतो. त्यानंतर त्या ठरवलेल्या नियमांनुसार आवश्यक असलेले छोटे व्यवहार AI एजंट स्वतः करू शकेल. यामुळे प्रत्येक वेळी ग्राहकाला स्वतः पेमेंट करण्याची गरज भासणार नाही.

» या प्रस्तावित प्रणालीच्या चौकटीला 'युनिफाइड एजंट प्रोटोकॉल' (Unified Agent Protocol) असे नाव देण्यात आले आहे. मुंबईत पुढील आठवड्यात होणाऱ्या 'ग्लोबल फिनटेक फेस्ट'मध्ये यासंदर्भात घोषणा होण्याची शक्यता आहे. या प्रणालीअंतर्गत ग्राहक आपल्या AI एजंटला किती रक्कम आणि कोणत्या वेळी खर्च करण्याची परवानगी आहे, याबाबत आधीच नियम निश्चित करू शकतील. अमेरिका, युरोप, सिंगापूर आणि ऑस्ट्रेलियासारख्या देशांमध्येही पेमेंट क्षेत्रातील कंपन्या अशाच प्रकारच्या तंत्रज्ञानावर काम करत असल्याचे सांगितले जात आहे.

» UPI Circle : UPI Circle सुविधेत मुख्य खातेदार दुसऱ्या व्यक्तीला आपल्या खात्यातून पेमेंट करण्याची परवानगी देऊ शकतो. याच प्रकारचा अधिकार भविष्यात AI एजंटलाही दिला जाऊ शकतो.

» Reserve Pay : Reserve Pay सुविधेमध्ये ग्राहकांना भविष्यातील अनेक व्यवहारांसाठी निधी आधीच राखून ठेवण्याची सुविधा मिळते. सध्या बँका जास्तीत जास्त ९० दिवसांसाठी १० हजार रुपयांपर्यंतची रक्कम राखून ठेवण्याची परवानगी देतात. मात्र, AI आधारित पेमेंटसाठी या मर्यादेचा फेरविचार होण्याची शक्यता आहे.

### नेमके कसे काम करणार?



सुरुवातीच्या टप्प्यात वारंवार होणाऱ्या छोट्या व्यवहारांसाठी AI एजंटचा वापर केला जाऊ शकतो. उदाहरणार्थ, किराणा किंवा दैनंदिन गरजेच्या वस्तूंची खरेदी. ई-कॉमर्स संकेतस्थळावर प्रत्येक वेळी ग्राहकाने स्वतः व्यवहाराला मंजुरी देण्याऐवजी, ठरावीक नियमांच्या मर्यादेत खरेदी करण्याची जबाबदारी AI एजंटला देता येऊ शकते. उदाहरणार्थ, ग्राहकाने एखाद्या वस्तूची खरेदी करण्यासाठी ठरावीक रकमेची मर्यादा निश्चित केली असल्यास, त्या मर्यादेत AI एजंट स्वतः व्यवहार पूर्ण करू शकतो.

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



## मुदखेड, बारडमध्ये बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद

### अत्यावश्यक सेवा वगळता सर्व प्रतिष्ठाने बंद



**मुदखेड (प्रतिनिधी)** – सकल मराठा समाजाच्या वतीने मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आमरण उपोषणास बसलेले संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांना पाठिंबा देण्यासाठी मुदखेड, बारड बंद ठेवण्याचे आवाहन करण्यात आले होते. अत्यावश्यक सेवा वगळता सर्व प्रतिष्ठाने बंद ठेवून व्यापाऱ्यांनी बंदमध्ये सहभाग घेऊन पाठिंबा दर्शविला आहे.

मुदखेड तालुक्यातील बारड नगरीत सकल मराठा युवा संघटनेच्या वतीने गाव बंदचे शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर रोजी हाक देण्यात आली होती. व्यापाऱ्यांनी सकाळपासूनच आपली प्रतिष्ठाने बंद ठेवून कडकडीत बंद पाळला होता. यामुळे नेहमी वर्दळ असलेल्या बाजारपेठेत शुकशुकाट पाहावयास मिळाला. सकल मराठा युवक बांधवांनी गावातून फेरी काढत एक मराठा लाख मराठाच्या घोषणा देत सरकारचा निषेध नोंदविला. यावेळी विजय देशमुख, माधव पावडे, दीपक पाटील, कृष्णकांत देशमुख, पुंडलिक देशमुख, शंकर पांडागळे, नितीन भोसले यांच्यासह आदींनी सहभाग घेतला होता.

सकल मराठा समाज बांधवांनी पुकारलेल्या बंदला मुदखेड शहरातील चांगला प्रतिसाद मिळाला आहे. व्यापाऱ्यांनी आपली प्रतिष्ठाने बंद ठेवून १००% बंदमध्ये सहभाग घेतला होता. मराठा समाज बांधवांनी छत्रपती स्मारका- जवळील उमरी चौकात ठिय्या मांडत शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर रोजी रास्ता रोको करण्यात आला. यामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. शहरात बंदमुळे नेहमीप्रमाणे वर्दळ पहावयास मिळाली नाही. सकल मराठा बांधवांनी आरक्षण आमच्या हक्काचे, नाही कुणाच्या बापाचे आदी घोषणा देत सरकारचा तीव्र शब्दात निषेध नोंदविला. मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या त्वरित मान्य करून आमरण उपोषण सोडवावे या आशयाचे लेखी निवेदन प्रशासनाला देण्यात आले आहे. यावेळी मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जरांगे यांच्या उपोषणाला नायगाव तालुक्यातून पाठिंबा; राहेर, गडगा येथे रास्ता रोको, बाजारपेठा कडकडीत बंद



**नायगाव (प्रतिनिधी)** – मनोज जरांगे यांच्या उपोषणाच्या समर्थनार्थ नायगाव तालुक्यातील राहेर व गडगा येथे शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर रोजी सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. तसेच नायगाव, राहेर, मांजरम, गडगासह परिसरातील विविध ठिकाणी बाजारपेठा कडकडीत बंद ठेवून जरांगे यांच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शविण्यात आला. रास्ता रोकोमुळे काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला, तर बाजारपेठा बंद असल्याने दैनंदिन व्यवहारही विस्कळीत झाले.

मनोज जरांगे यांच्या मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, या मागणीसाठी मराठा समाज बांधवांनी एकत्र येत आंदोलन केले. राहेर व गडगा येथे रस्त्यावर उतरलेल्या आंदोलकांनी शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. मागण्यांबाबत शासनाने विलंब न करता ठोस भूमिका जाहीर करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

राज्यातील विविध भागांतही जरांगे यांच्या उपोषणाच्या समर्थनार्थ रास्ता रोको, बंद आणि विविध प्रकारची आंदोलने सुरू असल्याचे चित्र आहे. अनेक ठिकाणी व्यापारी व नागरिकांनी बाजारपेठा बंद ठेवून आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. त्याच पार्श्वभूमीवर नायगाव तालुक्यातही बंदला प्रतिसाद मिळाला. नायगाव शहरासह मांजरम व अन्य ठिकाणी दुकाने बंद ठेवण्यात आल्याने बाजारपेठांमध्ये दिवसभर शुकशुकाट दिसून आला.

दरम्यान, रास्ता रोको आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाने खबरदारी घेतली होती. आंदोलनादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये. तसेच वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी राहेर व गडगा परिसरात पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. नायगाव पोलीस ठाण्याचे सपोनि विजय जाधव तसेच कुंटूर पोलीस ठाण्याचे सपोनि विशाल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी परिस्थितीवर लक्ष ठेवले.

आंदोलन शांततेत पार पडावे, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी आणि नागरिकांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी पोलिसांकडून आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या. शासनाने आंदोलकांच्या मागण्यांची दखल घेऊन लवकरात लवकर तोडगा काढावा, अशा मागणीचे निवेदन तहसीलदार धम्मप्रिया गायकवाड, सपोनि विशाल भोसले, सपोनी विजय जाधव यांच्याकडे रणजित देशमुख, हणमंत पाटील शिंदे, साई पाटील मोरे, बालाजी देशमुख, गंगाधर पाटील बेलकर, जयराम पाटील नरवाडे राहेरकर, भगवान पाटील हिवराळे, किरण पाटील हिवराळे, माधव पाटील नरवाडे, चक्रधर शिंदे, रितेश कल्याण, शिवा पाटील गोदमगावकर, गजानन हिप्परगेकर, बालाजी धनंजकर, परमेश्वर कदम, गिरीश चव्हाण यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी दिले.

## कल्याण मटका आणि तिर्रट जुगारावर एकाच दिवशी तीन ठिकाणी छापे; २१ आरोपी ताब्यात

### एसपी डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने ग्रामीण पोलिसांची कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)**– पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने अवैध धंद्यांच्या उच्चाटनासाठी सुरू असलेल्या विशेष मोहिमेंतर्गत नांदेड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर आणि पोलीस उपनिरीक्षक बाबुराव चव्हाण यांच्या पथकाने दि. ३ सप्टेंबर रोजी एकाच दिवशी तीन वेगवेगळ्या ठिकाणी जुगार अड्ड्यांवर धाडी टाकल्या. या कारवाईत २१ आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करून ६ लाख ६६ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**खुदबे नगर चौरस्ता (कल्याण मटका)**

खुदबे नगर चौरस्ता, हबीबिया कॉलनी समोर कल्याण मटका जुगार सुरू असल्याच्या गोपनीय माहितीवरून गुन्हे शोध पथकाने छापा मारला. यावेळी ११ आरोपींमध्ये नासिरखान समशेरखान (वय ६०), शेख अनसार शेख अमीन (वय ५६), शेख शकील शेख इस्माईल (वय ४२), वाजिद खान रमजान खान (वय ३४), मोहम्मद आसिफ अकबर (वय ४२), वाजीद खान अमीरखान (वय ३८), माजीदखान हामीदखान (वय ५०), शेख गौस शेख हसन (वय ३६), उस्मान अहमद अली (वय ५८), मोहम्मद अफरोज मोहम्मद सुभान (वय ३०) व मटका चालक शेख जमीर उर्फ अब्बू हे आकड्यांवर पैसे लावताना मिळाले. त्यांच्याकडून ४२ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल (रोकड, ५ मोबाईल, मटका चिठ्ठ्या) जप्त करण्यात आला. गु.र.नं. १११३/२०२६ कलम १२(अ) जुगार कायद्यान्वये नोंद करण्यात आली.

**गोपाळचावडी कॅनॉल रोड (तिर्रट जुगार)**

गोपाळचावडी कॅनॉल रोडलगत मोकळ्या जागेत तिर्रट जुगार सुरू असल्याची माहिती मिळताच पथकाने ४ जुगाऱ्यांना ताब्यात घेतले. यात शांतू मठपती (वय ४०), मोहन राठोड (वय ४६), आनंदा हैबतकर (वय ४२) व अशोक बनसोडे (वय ३७) यांचा समावेश आहे. त्यांच्याकडून ३ हजार ६५० रुपये रोकड, ५२ हजार रुपयांचे ४ मोबाईल व १ लाख ७० हजार रुपयांच्या ३ मोटारसायकली क्रमांक (MH-26-BL-8463, MH-26-CL-7232, MH-26-Z-6955) असा एकूण २ लाख २५ हजार ३५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**गोपाळचावडी पाण्याची टाकी परिसर (तिर्रट जुगार)**

सायंकाळी पाण्याच्या टाकीशेजारील मोकळ्या जागेत छापा टाकून ६ आरोपींना ताब्यात घेण्यात आले. ताब्यात घेण्यात आलेल्या जुगाऱ्यांमध्ये कृष्णा हैबतकर (वय २४), गोरकनाथ गायकवाड (वय ३०), नामदेव कोनापुरे (वय ३५), योगेश दुरनाळे (वय ३२), जालिंदर नेंपनवाड (वय ३२) व सुभाष धसाडे (वय २३) यांचा समावेश आहे. त्यांच्याकडून ११,३०० रु. रोकड, १ लाख १२ हजार रुपयांचे ५ मोबाईल व ४ मोटारसायकली (MH-26-P-7002, MH-26-CT-6809 सह आदी) असा तीन लाख ९८ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरची कारवाई नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या पथकाने पार पाडली असून, पुढील तपास सुरू आहे.

## नांदेड मनपात अग्निशमन विभागाचा 'डेटा गायब'!

### २०२२ पासूनच्या फाईल्स बेपत्ता

**नांदेड प्रतिनिधी)**– येथील महानगर-पालिकेच्या कारभारावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. अग्निशमन अधिकारी केरोजी दासरे यांनी पदभार सोडताच सन २०२२ पासूनच्या महत्त्वाच्या फाईल्स आणि संगणकीय नोंदी गायब झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.





महापालिकेच्या अग्निशमन विभागाकडून इमारती, व्यावसायिक आस्थापना आणि बांधकामांना अग्निसुरक्षा परवाने दिले जातात. या परवानग्या, तपासणी अहवाल आणि फाईल्स अत्यंत महत्त्वाच्या असतात. अशा स्थितीत तब्बल चार वर्षांचा डेटा गायब होणे ही केवळ प्रशासकीय चूक नसल्याची चर्चा आहे.

दासरे यांच्या कार्यकाळात कामकाजाबाबत अनियमिततेचे आरोप होत होते. मागील महिन्यात त्यांना पदावरून कमी केल्यानंतर नियमानुसार संपूर्ण पदभार, कागदपत्रे आणि डिजिटल डेटा उत्तराधिकाऱ्याकडे सुपूर्द करणे अपेक्षित होते. मात्र जुना डेटा उपलब्ध नसल्याचे समोर आल्याने संशय अधिक बळावला आहे.

२०२२ पासूनच्या फाईल्स नेमक्या कुठे गेल्या? त्या कोणी हटवल्या? संगणकीय नोंदी डिलीट झाल्या की अन्यत्र हलवण्यात आल्या? या काळात किती परवानग्या दिल्या गेल्या? या घटनेमुळे महापालिकेच्या डिजिटल सुरक्षिततेबाबतही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. संबंधित संगणक, सर्व्हर आणि बॅकअपचे तातडीने तांत्रिक ऑडिट करून डेटा पुनरप्राप्त करण्याची मागणी होत आहे. हा योगायोग आहे की नियोजित प्रकार, याचा छडा लावण्यासाठी स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नांदेडकरांमधून होत आहे.

## कंधार पोलिसांची कारवाई; अवैध देशी दारू वाहतूक करणारी कार जप्त, २.२३ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**नांदेड (प्रतिनिधी)** –पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने अवैध धंद्यांविरुद्ध सुरू असलेल्या विशेष मोहिमेत कंधार पोलिसांनी अवैध देशी दारू वाहतुकीवर कारवाई करत २ लाख २३ हजार ४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दि. २ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री प्रभारी अधिकाऱ्यांना पेठवडज येथून अवैध दारू वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पेठवडज ग्रामीण बँकेसमोर सापळा रचण्यात आला. यावेळी कार क्र. (MH-14-CK-6924) ची तपासणी केली असता त्यात देशी दारूच्या २८८ बाटल्या आढळल्या.

पोलिसांनी पंचासमक्ष २३ हजार ४० रुपये किमतीच्या दारू बाटल्या आणि वाहतुकीसाठी वापरलेली २ लाख रु. किमतीची कार असा एकूण २ लाख २३ हजार ४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी आरोपी आकाश सत्यपाल पुडवाड (वय २५, रा. पेठवडज ता. कंधार) याच्याविरुद्ध कंधार पोलीस ठाण्यात गु.र.नं. ३२२/२०२६, कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, सुरज गुरव, उपविभागीय अधिकारी सुशील जुमडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सदाशिव भडीकर, अंमलदार डिकळे व गणपत केंद्रे यांनी पार पाडली.

## जिल्ह्यात खुनासह घरफोडी, गुटखा व अवैध रेती वाहतुकीचे गुन्हे दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)**–जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी घडलेल्या गंभीर घटनांमध्ये पोलिसांनी गुन्हे दाखल करून तपास सुरू केला आहे. यात भोकरमध्ये खून, घरफोडी, गुटखा तर विमानतळ पोलीस ठाण्यात अवैध वाळू वाहतुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**भोकरमध्ये पतीकडून पत्नीचा खून**

दि. ३ सप्टेंबर रोजी सकाळी ६ वाजता बटाळा रोड, भोकर येथे ऊस तोडीला जाण्याच्या कारणावरून वाद झाल्याने पती हनमंत रमेश भोसले (वय ३५) याने पत्नी ममता हनमंत भोसले (वय ३१) हिचा दोरीने गळा आवळून खून केला. फिर्यादी सोसलाल जीवन चव्हाण (रा. पिटलवाडा, आदिलाबाद) यांच्या तक्रारीवरून भोकर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ४६५/२०२६ कलम १०३(१) BNS अन्वये गुन्हा दाखल असून, आरोपीस अटक करण्यात आली आहे. तपास पोलीस निरीक्षक विश्वंभर पल्लेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि कांबळे करीत आहेत.

**धर्माबादमध्ये घरफोडी**

दि. ३१ ऑगस्ट रात्री ११ ते १ सप्टेंबर सकाळी ६ दरम्यान पीएम कॉलनी, धर्माबाद येथे फिर्यादी अश्विनी गजानन टापरे यांच्या घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने १ लाख ५३ हजार रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले. धर्माबाद पोलीस ठाण्यात गु.र.नं. २१३/२०२६ कलम ३३१(३), ३०५ BNS अन्वये गुन्हा दाखल असून तपास सपोनि पगलवाड करीत आहेत.

**माहूरमध्ये अवैध गुटखा वाहतूक जप्त**

दि. ३ सप्टेंबर रोजी दुपारी २.३० वाजता ईश्वरपूर-कुपटी रोडवर सुरज अनिल चव्हाण (वय २२, रा. बोरवाडी) व सलीम कच्ची (रा. हिवरा) हे विनापरवाना ९ हजार ९०० रुपये किमतीचा गुटखा, पानमसाला मोटारसायकल क्र. एमएच-२९ बीएस-६६१० (किंमत ४० हजार) वरून विक्रीसाठी नेताना मिळाले. माहूर पोलीस ठाण्यात गु.र.नं. १८०/२०२६ कलम १२३, २२३, २७४, २७५, ३(५) BNS सह अन्न सुरक्षा कायदा कलम ५९ अन्वये गुन्हा दाखल आहे.

**विमानतळ हद्दीत अवैध रेती चोरी**

दि. ३ सप्टेंबर रोजी पहाटे ४.१५ वाजता आसराजनगर रोडवर नागसेन ईश्वर भालेराव (रा. बोंढार) हा टेम्पो क्र. एमएच-०४-बीयु-५७८२ (किंमत साडेतीन लाख) मध्ये ४ हजार रुपये किमतीची एक ब्रास रेती विनापरवाना वाहतूक करताना मिळाला. विमानतळ पोलीस ठाण्यात गु.र.नं. ४२२/२०२६ कलम ३०३(२) BNS व महाराष्ट्र जमीन महसूल कायदा ४८(७)(८) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## हरदीपसिंघ गिल यांनी घेतले तख्त सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वाराचे दर्शन



**नांदेड (प्रतिनिधी)**– राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे उपाध्यक्ष हरदीपसिंघ गिल यांनी नांदेड येथील दौऱ्यात सुप्रसिद्ध तख्त सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वारा येथे गुरुग्रंथ साहिब यांचे दर्शन घेतले.

बाबा जीवनसिंघ यांचे जन्मदिवस साजरा करण्यासाठी अमृतसर येथून विशेष रेल्वेने आणलेल्या सर्व संगतसोबत गिल यांनी तख्त सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वाराचे माथा टेकून दर्शन घेतले. यावेळी तख्त सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वारा बोर्डाच्यावतीने राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे उपाध्यक्ष हरदीपसिंघ गिल यांचा पारंपरिक पद्धतीने शाल, श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी सुरेश लोट, अवतारसिंघ पहरेदार आदी उपस्थित होते.

## शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांवर शिक्षणाधिकाऱ्यांशी चर्चा; शिक्षक सेनेचे शिष्टमंडळ भेटले



**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे यांच्या दालनात शिक्षक सेनेच्या शिष्टमंडळाने विविध प्रलंबित प्रश्नांवर चर्चा केली.

यावेळी सेवानिवृत्त शिक्षकांच्या सेवानिवृत्तीच्या फाईल्स विनाविलंब निकाली काढाव्यात, माध्यमिक शिक्षकांची चट्टोपाध्याय निवड श्रेणी तातडीने काढावी, लोहा तालुक्यातील NPS ची परत गेलेली रक्कम परत मागवून संबंधित शिक्षकांच्या खात्यात जमा करावी, अशा मागण्या करण्यात आल्या.

ई-फाईल प्रणालीचे स्वागत असले तरी पंचायत समिती स्तरावर गटशिक्षणाधिकारी कार्यालयात अद्याप ही प्रणाली नसल्याने अनेक बिले प्रलंबित असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. यावर तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली.

यावर शिक्षणाधिकारी श्रीमती फुटाणे यांनी पदोन्नती व प्राथमिक शिक्षकांच्या चट्टोपाध्याय निवड श्रेणीबाबत शासनाकडून मार्गदर्शन मागवले असून, लवकरच निर्णय होईल, अशी माहिती दिली. तसेच NPS रक्कम जमा केलेल्या कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

यावेळी शिक्षक सेनेचे राज्य उपाध्यक्ष विठूभाऊ चव्हाण, जिल्हाध्यक्ष संतोष अंबुलगेकर, जिल्हाध्यक्ष परशुराम येसलवाड, जिल्हा उपाध्यक्ष अविनाश चिद्रावार, जिल्हा सरचिटणीस रवी बंडेवार, जिल्हा संघटक गोविंद सुवर्णकार, पुरुषोत्तम मोतेवार, रामदास देशमुख आदी पदाधिकारी उपस्थित होते.

पान १ वरून...

**जात पडताळणी समितीवर...**

प्रसाद लाड यांच्या शिष्टमंडळाने जरांगेंची भेट घेतली, मात्र अडीच तासांच्या चर्चेनंतरही तोडगा निघाला नाही. या सर्व घडामोडींवर आता राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी आक्रमक भूमिका घेत महायुती सरकारला घरचा आहेर दिला आहे.

मराठा समाजाकडून कुणबी प्रमाणपत्र घेताना दाखल्यावर खडाखोडी करण्यात आल्या आहे. आता ते दाखले तुम्ही स्वीकारणार आहात का? जात पडताळणी समितीवर कुणीही दबाव आणू नये. राज्यातील महायुतीच्या नेत्यांनी लक्षात घ्यावे. ओबीसींनी तुम्हाला मदत केली आहे. तुमचं सरकार आणण्यात ओबीसींचा महत्त्वाचा हातभार आहे, असे म्हणत छगन भुजबळ यांनी सरकारला घरचा आहेर दिला.

## ई- पॉस मशीनच्या सर्व्हर अडचणींविरोधात रास्त भाव दुकानदारांचे आंदोलन; ७ सप्टेंबरला धान्य वितरण बंद

**नांदेड (प्रतिनिधी)**– ई- पॉस मशीनच्या इंटरनेट सर्व्हरमध्ये गेल्या काही महिन्यांपासून येत असलेल्या तांत्रिक अडचणींमुळे त्रस्त झालेल्या रास्त भाव दुकानदारांनी सोमवार, दि. ७ सप्टेंबर २०२६ रोजी राज्यभर दिवसभर धान्य वितरण बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

केंद्र शासनाच्या NIC माध्यमातून ई-पॉस मशीनला इंटरनेट सेवा पुरवली जाते. या सेवेत वारंवार बिघाड होत असल्याने दुकानदार आणि शिधापत्रिकाधारक दोघांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे. प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही ठोस सुधारणा होत नसल्याने ऑल महाराष्ट्र फेअर प्राईस शॉप किपर्स फेडरेशनने या बंदची हाक दिली आहे.

या संदर्भात नांदेड जिल्ह्यातील दुकानदारांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. राज्य फेडरेशनच्या शिष्टमंडळाने २१ ऑगस्ट रोजी मंत्रालयात संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून लेखी निवेदन दिले होते, मात्र कार्यवाही झाली नाही. त्यामुळे ७ सप्टेंबर रोजीच्या बंदमध्ये जिल्हा, शहर व तालुक्यातील सर्व रास्त भाव दुकानदारांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष अशोक एडके यांनी केले आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com